नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २७२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ‘आडमुठेपणाची भूमिका घेऊ नका’; जरांगेंवर शिंदेंचा निशाणा!

## सरकार सकारात्मक; कायदेशीर व संविधानिक चौकटीत मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका कायम — एकनाथ शिंदे

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली असून, मराठा समाजाच्या मागण्या कायदेशीर आणि संविधानिक चौकटीत पूर्ण करण्यासाठी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. सरकार चार पावले पुढे येऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना मनोज जरांगे पाटील यांनीही सहकार्याची भूमिका घ्यावी. आंदोलनाच्या माध्यमातून आडमुठेपणाची भूमिका घेऊ नये तसेच मराठा समाजाच्या आंदोलनाला राजकीय वळण देण्याचा प्रयत्न करू नये, असा स्पष्ट इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.




मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत सरकारची भूमिका सुरुवातीपासूनच सकारात्मक आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी शासनाचे प्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच मंत्री सातत्याने चर्चा करीत आले आहेत. मराठा समाजाच्या प्रश्नांवर संवादाच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न राहिला आहे. त्यामुळे सरकारकडून कोणताही आडमुठेपणा करण्यात आलेला नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

**२०१४ पासून आरक्षणासाठी सरकारचे प्रयत्न :** मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यापूर्वी अनेक सरकारे आली आणि गेली. मराठा समाजातील अनेक नेतेही सरकारमधील महत्त्वाच्या पदांवर होते. मात्र या प्रश्नाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही, अशी वस्तुस्थिती आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या मंत्रिमंडळात आपणही होतो. त्यावेळी सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी ठोस पाऊल उचलले. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत आरक्षणाच्या टक्केवारीबाबत निर्णय झाला; मात्र पुढे सरकार बदलल्यानंतर ते आरक्षण टिकविण्यात अडचणी निर्माण झाल्या, असे शिंदे यांनी सांगितले. त्यानंतर आपण मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष अधिवेशन बोलावून हा निर्णय करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या साक्षीने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा शब्द सरकारने दिला आणि तो प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. आज या १० टक्के आरक्षणाचा लाभ मराठा समाजातील विद्यार्थी आणि तरुण घेत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

**५ हजार ३०० उमेदवारांना नियुक्त्या :** न्यायालयीन स्थगितीमुळे सुमारे ५ हजार ३०० उमेदवारांच्या नियुक्त्या रखडल्या होत्या. त्यावेळी या उमेदवारांना नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सरकारने ठाम भूमिका घेतली. कोणतीही कारवाई झाली तरी त्याला सामोरे जाण्याची तयारी आपण जाहीरपणे व्यक्त केली होती. आज हे ५ हजार ३०० उमेदवार सेवेत कार्यरत आहेत, असा दावा शिंदे यांनी केला.

**अण्णासाहेब पाटील महामंडळ, सारथीच्या माध्यमातून सुविधा :** मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. कर्जाची मर्यादा वाढविण्यात आली असून, बिनव्याजी कर्जाच्या माध्यमातून तरुणांना उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी मदत करण्यात येत आहे. सारथीच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधा, वसतिगृह तसेच परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती यांसारख्या योजना राबविण्यात आल्या आहेत. मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, रोजगार आणि आर्थिक प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. इतर समाजाच्या आरक्षणाला किंवा सवलतींना धक्का न लावता मराठा समाजाला आवश्यक सुविधा देण्याची सरकारची भूमिका आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

**कुणबी नोंदींसाठी शिंदे समिती :** कुणबी नोंदी उपलब्ध असलेल्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी न्यायमूर्ती शिंदे समिती स्थापन करण्यात आली. या प्रक्रियेला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आले. युद्धपातळीवर काम करून अनेक पात्र नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. मराठा समाजाच्या मागण्यांपैकी या महत्त्वाच्या मागणीवरही सरकारने कार्यवाही केली असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

तसेच मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यासंदर्भात मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात आली. न्यायमूर्ती सुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची प्रक्रिया पुढे नेण्यात आली. या सर्व निर्णयांमागे मराठा समाजाला न्याय देण्याचीच सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**इतर समाजावर अन्याय होणार नाही :** मराठा समाजाला न्याय देताना ओबीसी किंवा अन्य कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, ही भूमिका सरकारने सुरुवातीपासून घेतली आहे आणि ती आजही कायम आहे. कोणत्याही समाजाचे आरक्षण किंवा सवलती कमी न करता मराठा समाजासाठी आवश्यक निर्णय घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. काही प्रश्न न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर न्यायालयीन प्रक्रियेचा आदर करणे आवश्यक आहे, असे शिंदे म्हणाले.

**गणेशोत्सवाच्या काळात आंदोलनाबाबत आवाहन :** सध्या गणेशोत्सव सुरू असून मुंबईत लाखो गणेशभक्त आणि हजारो गणेश मंडळे उत्सवात सहभागी झाली आहेत. महाराष्ट्रासह देश-विदेशातून नागरिक गणेशोत्सवासाठी मुंबईत येतात. गणेशोत्सव हा मोठा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव असल्याने या काळात कोणत्याही प्रकारचे विघ्न निर्माण होऊ नये, याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. गणेशभक्तांची गैरसोय होणार नाही, यासाठी सरकार आणि पोलीस यंत्रणा प्रयत्नशील आहे. आंदोलकांनीही याचा विचार करावा, असे आवाहन शिंदे यांनी केले. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी यापूर्वी ५८ मोर्चे निघाले. लाखो लोक या मोर्चांमध्ये सहभागी झाले. या मोर्चांची जगानेही नोंद घेतली. मात्र त्या आंदोलनांमुळे अन्य समाजाची किंवा सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात आली होती. त्याच पद्धतीने सध्याच्या आंदोलनातही संयम आणि जबाबदारीची भूमिका अपेक्षित आहे, असे शिंदे म्हणाले.

### ‘आंदोलनाला राजकीय वळण देऊ नका’

लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करण्याचा आणि आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र टीका किंवा आंदोलन करताना त्यामध्ये समाजाच्या हिताची भूमिका असली पाहिजे. मराठा समाजाला न्याय मिळावा, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी मिळाव्यात आणि तरुणांना रोजगार मिळावा, हा उद्देश केंद्रस्थानी असला पाहिजे. आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय भूमिका घेणे योग्य नाही, असे शिंदे यांनी सांगितले.

### न्यायप्रविष्ट विषयांवरही चर्चा करण्याची तयारी

मराठा आरक्षणाशी संबंधित काही विषय न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यामुळे त्याबाबत न्यायालयीन प्रक्रियेचा विचार आंदोलकांनीही केला पाहिजे. जे प्रश्न सरकारच्या पातळीवर सोडविता येतात, त्यावर सरकार चर्चा करण्यास तयार आहे. सरकारने आतापर्यंत अनेक निर्णय घेतले असून, पुढील मागण्यांवरही सकारात्मक चर्चा करण्याची तयारी आहे.

सरकार मराठा समाजासाठी सकारात्मक निर्णय घेत असताना समोरच्या बाजूनेही सकारात्मक भूमिका अपेक्षित आहे. सरकारने चार पावले पुढे टाकली असतील तर आंदोलकांनीही सहकार्याची भूमिका घ्यावी. समाजाच्या मागण्यांच्या आडून कोणाचीही राजकीय पोळी भाजली जाऊ नये. मराठा समाजाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न कोणी करू नये, असा टोला शिंदे यांनी लगावला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारचे प्रतिनिधी यापूर्वीही त्यांच्याशी चर्चा करीत आले आहेत. गेल्या आठवड्यातही सरकारचे मंत्री आंदोलकांशी संवाद साधण्यासाठी गेले होते. त्यामुळे सरकार संवादापासून पळ काढत नसून, उलट सातत्याने संवाद साधत आहे. आता आंदोलकांनीही सकारात्मक भूमिका घेऊन चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले. मराठा समाजाला कायदेशीर व संविधानिक चौकटीत न्याय देण्यासाठी सरकारची भूमिका कायम असून, समाजहिताला प्राधान्य देत प्रश्न सोडविण्यासाठी सरकार पुढेही संवादाची दारे खुली ठेवणार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

# UPI च्या २ हजार रुपयांवरील व्यवहारांवर ३०० रुपयांपर्यंत शुल्क

मुंबई : (स. गांवकरी)

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (NPCI) मंगळवारी जाहीर केले की, १५ ऑक्टोबरपासून व्यापाऱ्यांना UPI द्वारे २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचे पेमेंट स्वीकारताना ०.४ टक्के शुल्क भरावे लागेल. ‘मर्चंट डिस्काउंट रेट’ (MDR) असे संबोधले जाणारे हे शुल्क प्रति व्यवहार जास्तीत जास्त ३०० रुपयांपर्यंत मर्यादित असेल. याचाच अर्थ असा की, जर एखाद्या व्यापाऱ्याला UPI द्वारे ७५,००० रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचे पेमेंट केले गेले, तरीही MDR शुल्क ३०० रुपयांपेक्षा जास्त असणार नाही. दरम्यान, रेल्वे, दूरसंचार सेवा, विमा आणि इंधन यांसारख्या




विशिष्ट श्रेणींमधील व्यापाऱ्यांना केलेल्या २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या UPI व्यवहारांवर, प्रति व्यवहार ५ रुपये इतके निश्चित MDR शुल्क आकारले जाईल. “या निश्चित दराच्या पद्धतीमुळे महत्त्वपूर्ण सार्वजनिक सेवा, उपयुक्तता सेवांची बिले स्वीकारण्याची प्रक्रिया आणि किरकोळ इंधन विक्रीसारख्या कमी नफ्याचे प्रमाण असलेल्या क्षेत्रांमधील खर्चात होणारी वाढ रोखली जाईल. यामुळे ग्राहकांसाठीच्या अत्यावश्यक सेवा कमी खर्चात आणि डिजिटलदृष्ट्या कार्यक्षम राहणे निश्चित होईल”, असे NPCI ने एका निवेदनात म्हटले आहे. मंगळवारी जाहीर करण्यात आलेला नवा मर्चंट डिस्काउंट रेट (MDR ) नियम केवळ ‘पर्सन-टू-मर्चंट’ म्हणजेच ग्राहक आणि व्यापारी यांच्यातील व्यवहारांना लागू होईल. ‘पर्सन-टू-पर्सन’ म्हणजेच दोन व्यक्तींमधील कोणत्याही रकमेचा व्यवहार यापुढेही मोफत राहतील.

# उपवर्गीकरणाचा विषय पुन्हा पेटला

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मुंबईत आंदोलनाचे वारे वाहत असताना आता सकल मातंग समाजानेही मुंबईत धडक देण्याचा निर्णय घेत आंदोलनाची हाक दिली आहे. अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी ‘मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान’ असा निधार महामोर्चा सकल मातंग समाज काढणार आहे. मातंग समाज आक्रमक झाल्याने उपवर्गीकरणाचा थंड बस्त्यात गेलेला विषय पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मंगळवारी मातंग समाजाचे आमदार व चळवळीतील कार्यकर्ते यांची बैठक पार पडली.

# दिघी येथे जहाजबांधणी प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार

## माझगाव डॉकची १५ हजार कोटींची गुंतवणूक, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या

मुंबई : (स. गांवकरी)

रायगडमधील दिघी येथे नव्याने होणाऱ्या प्रकल्पात जहाजबांधणी केंद्र म्हणून सहभागी होण्यासाठी नॅशनल शिपबिल्डिंग हेवी इंडस्ट्रिज पार्क महाराष्ट्र लिमिटेड आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित पार पडलेल्या या करारामुळे राज्यात ९० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.



महाराष्ट्रात ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मुंबई बंदर प्राधिकरण यांनी संयुक्तपणे नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेड (एनशिपएमएल) या विशेष उद्देश कंपनीची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकास आराखड्यांतर्गत हा प्रकल्प पुढे नेण्यात येत असून, तो ‘मेरीटाईम अमृत काल व्हिजन २०४७’च्या उद्दिष्टांना पूरक ठरेल.

या करारानुसार माझगाव डॉक शिपबिल्डर्सने दिघी येथे प्रतिवर्ष किमान १.२ दशलक्ष सकल टनभार (ग्रॉस टनेज) जहाजबांधणी क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे मोठ्या व्यावसायिक जहाजांची निर्मिती करणे शक्य होणार असून, देशाच्या सागरी औद्योगिक क्षमतेला बळकटी मिळेल. दिघीतील या प्रकल्पामुळे आधुनिक जहाजबांधणी पायाभूत सुविधा तसेच त्यास पूरक औद्योगिक व पुरवठा साखळी परिसंस्था विकसित होणार आहे. देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता वाढ, तंत्रज्ञान व गुंतवणूक आकर्षित करणे, कुशल रोजगारनिर्मिती आणि जागतिक सागरी क्षेत्रातील भारताची स्पर्धात्मकता वाढविण्यास या प्रकल्पामुळे चालना मिळेल. माझगाव डॉक शिपबिल्डर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन यांनी राज्य सरकारच्या सहाकार्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. जटिल जहाजबांधणी, अभियांत्रिकी, प्रकल्प व्यवस्थापन आणि सक्षम देशांतर्गत पुरवठादार व्यवस्था विकसित करण्याचा अनुभव एमडीएलकडे आहे.

सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने दिघी येथे आधुनिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे आणि बंदरे व परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, बिझनेस डेव्हलपमेंटचे सरव्यवस्थापक संजयकुमार सिंह, मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. एमडीएलतर्फे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन तर एनशिपएमएलतर्फे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप पी. यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.



## थोडक्यात पण महत्वाचे




### हक्क संविधान आणि संस्कृतीचा त्रिवेणी संगम

कनाशी (स. गांवकरी) : जल, जंगल, जमीन आमच्याच हक्काची या घोषणेने बेंदीपाडा दुमदुमून गेला! कळवण तालुक्यात प्रथमच आदिवासी हक्क अधिकार दिन मोठ्या उत्साहात आणि अभ्यासपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. केवळ उत्सव नव्हे, तर हक्कांची जाणीव, संविधानिक संरक्षण आणि पेसा कायद्याचे शस्त्र हाती देणारा हा लढाऊ मेळावा ठरला. संविधानाच्या प्रस्तावना वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी पेसा तज्ज्ञ हेमंत चौधरी, इतिहास अभ्यासक महेंद्र गायकवाड, कायदा अभ्यासक ॲड. अविनाश जोंधळे, पेसा अभ्यासक सूर्यवंशी आदिवासी सेवक राम चौरे, के के गांगुर्डे, सुदाम भोये यांनी मार्गदर्शन केले. पेसा कायदा, शिक्षण, संस्कृती संवर्धन आणि जल-जंगल-जमिनीवरील आदिवासींचा नैसर्गिक हक्क यावर सखोल कॅडर प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाला आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी नितांत कांबळे उपस्थित होते. त्यांनी विभागाच्या विविध योजनांची माहिती देताना केवळ हक्कच नव्हे तर नागरिकांची कर्तव्ये यावरही प्रकाश टाकला. प्रमुख मान्यवरांना यावेळी संविधान प्रत भेट देण्यात आली, हा क्षण सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. सरपंच, उपसरपंच, पेसा अध्यक्ष, पोलीस पाटील, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सभागृह खचाखच भरले होते. चनकापूरचे मा सरपंच ज्ञानदेव पवार, बेंदीपाडा सरपंच जिजाबाई बागुल, माजी सरपंच फुलाजी बागुल, उपसरपंच सुरेश बागुल, गंगाधर बागुल पोलीस पाटील, लक्ष्मण गायकवाड, सागर बागुल यांच्यासह आदिवासी हक्क अधिकार कृती समिती, बेंदीपाडा व सकल आदिवासी समाज, कळवण यांनी कार्यक्रमाच्या यशासाठी विशेष मेहनत घेतली. समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीने बेंदीपाड्यात आदिवासी अस्मितेचा नवा अध्याय लिहिला गेला असून, आता हक्कांसाठी लढा अधिक तीव्र होणार, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण २२ सप्टेंबरला होणार निश्चित

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : ग्रामविकास विभागाच्या दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार, नांदेड जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी तालुकानिहाय सोडत काढण्यात येणार आहे. संबंधित तहसील कार्यालयाच्या मुख्यालयी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ही प्रक्रिया पार पडणार असून, संबंधित उपविभागीय अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील. तालुकानिहाय वेळापत्रक : नांदेड, भोकर, हदगाव, किनवट, धर्माबाद, बिलोली, देगलूर व कंधार येथे सकाळी १० वाजता, तर हिमायतनगर, माहूर, उमरी, नायगाव (खै.), मुखेड व लोहा येथे दुपारी ३ वाजता सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी सोडत घेण्यात येणार आहे. ग्रामपंचायतनिहाय सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळविले आहे.

### अधिष्ठात्यांच्या पाहणीदरम्यान गंभीर अवस्थेतील व्यक्तीस वैद्यकीय उपचार

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी ११ सप्टेंबर रोजी रुग्णालय परिसराची नियमित पाहणी केली. या पाहणीदरम्यान रुग्णालय परिसरात एक व्यक्ती गंभीर अवस्थेत आढळून आली. अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी तत्काळ परिस्थितीची दखल घेत रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने संबंधित व्यक्तीस अपघात विभागात दाखल केले. तेथे आवश्यक प्राथमिक वैद्यकीय तपासणी करून तातडीने उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचार व वैद्यकीय निरीक्षणासाठी संबंधित व्यक्तीस औषधवैद्यकशास्त्र विभागातील वॉर्ड क्रमांक ३३ मध्ये दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर आवश्यक उपचार व देखरेख सुरू आहे. तसेच रुग्णाच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना आवश्यक माहिती देण्यात आली आहे. रुग्णालय प्रशासनाच्या तत्परतेमुळे संबंधित व्यक्तीस वेळेत वैद्यकीय मदत उपलब्ध झाली. रुग्णालय परिसरातील नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिष्ठाता व रुग्णालय प्रशासनाकडून नियमित पाहणी करण्यात येत असून, परिस्थितीनुसार आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्यात येत आहे.

### १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त केंद्रीय संचार ब्यूरो नांदेड, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार आणि ग्रामपंचायत कार्यालय, बारड यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर २०२६ रोजी बारड (ता. मुदखेड, जि. नांदेड) येथे विविध विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामात बारड गावाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. या मुक्तिसंग्रामात बारड येथील ३३ स्वातंत्र्यसैनिकांनी सहभाग घेऊन मोलाचे योगदान दिले. या शूर स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यासाठी बारड येथील हुतात्मा स्मारक येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण 'मराठवाडा मुक्तिसंग्राम छायाचित्र प्रदर्शन' हे असणार आहे. या प्रदर्शनातून मुक्तिसंग्रामाची देदीप्यमान गाथा, हुतात्म्यांचे बलिदान, स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग तसेच मुक्तिसंग्रामातील शूरवीरांच्या योगदानाची माहिती नागरिकांना करून देण्यात येणार आहे. याशिवाय जिल्हा परिषद हायस्कूल व कन्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. शाहीर वाघमारे यांच्या पथकातर्फे देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरणही करण्यात येणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून नव्या पिढीला त्यांच्या योगदानाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्रीय संचार ब्यूरो, नांदेड आणि ग्रामपंचायत कार्यालय, बारड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६ मध्ये उद्योजकांनी सहभागी व्हावे

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : उद्योग आयुक्तालयांतर्गत जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्या वतीने जिल्ह्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच उद्योजक व गुंतवणूकदारांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६' आयोजित करण्यात येणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून पुढील आठवड्यात होणाऱ्या या परिषदेत जिल्ह्यातील उद्योजक व गुंतवणूकदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) अमोल इंगळे यांनी केले आहे.

# मातीच्या गोळ्यातून उमटली विद्यार्थ्यांची कलाकारी

## विद्यार्थ्यांनी २५० गणेशमूर्ती साकारल्या

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स तसेच राजमाता जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारी 'पर्यावरणपूरक गणपती बनवा' कार्यशाळा उत्साहात पार पडली. विशेष म्हणजे तब्बल २५० विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी शाडू मातीच्या गणेशमूर्ती साकारत 'माझा बाप्पा, माझ्या हातचा' हा अनुभव घेतला.

इयत्ता पहिली ते नववीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीला विविध आकार देत गणरायाच्या आकर्षक मूर्ती घडवल्या. माती मळण्यापासून मूर्तीला अंतिम आकार देण्यापर्यंतची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली. त्यामुळे कार्यशाळेत कला, कल्पकता आणि आनंद यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला.

पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्ती तयार करण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी 'बॅलन्सिंग गणपती' या अभिनव संकल्पनेचाही प्रयोग केला. संतुलन साधणाऱ्या गणेशमूर्ती साकारण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्न उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. पारंपरिक कलेला आधुनिक कल्पकतेची जोड देत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे अनोखे दर्शन घडविले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीचे महत्त्व, मूर्तीनिर्मितीची पद्धत, आकारनिर्मिती आणि नैसर्गिक रंगांचा वापर याबाबत प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन करण्यात आले. कु. ईश्वरी बोरकर, इयत्ता सातवी 'अ' हिने सांगितले की, "कवडे सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही गणपती तयार केला.

नैसर्गिक रंगांनी मूर्ती सजवून घरी प्रतिष्ठापना करणार असून विसर्जनानंतर मिळालेल्या मातीत फुलांचे झाड लावणार आहे."

या उपक्रमात महिला शिक्षिका श्रीमती रिमा भिंगारदिवे यांनीही विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष माती हाताळत गणेशमूर्ती साकारली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे केलेल्या या कलानिर्मितीमुळे कार्यशाळेला विशेष रंगत आली. "विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी गणेशमूर्ती तयार केल्याने त्यांच्या सर्जनशीलतेला मोठी चालना मिळाली. कला, श्रमप्रतिष्ठा आणि पर्यावरणाची जाणीव यांचा प्रत्यक्ष अनुभव या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाला," असे प्राचार्य श्री. कचरु शिंदे यांनी सांगितले.



**कार्यशाळेस कलाविभाग प्रमुख श्री. ज्ञानेश्वर कवडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य श्री. कचरु शिंदे, उपप्राचार्य श्री. संतोष इंगळे, पर्यवेक्षक श्री. अजित के. दिवटे, राजमाता जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका कविता गवते यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मातीच्या गोळ्यातून गणराय साकारताना विद्यार्थ्यांनी केवळ एक मूर्ती घडवली नाही, तर कला, कल्पकता आणि पर्यावरणाची जबाबदारी यांचा सुंदर धडा कृतीतून गिरवला.**

## सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन उत्साहात साजरा

तामसा : (स. गांवकरी)

तामसा नगरीतील विविध शाळांमध्ये सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने सर्व शासकीय कार्यालये व शाळांमध्ये सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन साजरा करण्याबाबत शासनमान्य आदेश पारित केल्याच्या पार्श्वभूमीवर तामसा येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी तामसा येथील प.पू. महंत श्री भोजराज दादा अमृते, प्रमुख वक्ते प.पू. महंत नितीन दादा बांधकर, परमपूज्य आप्पाजी बांधकर तसेच डॉ. संदीप कारंजकर, पत्रकार अर्जुन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वक्त्यांनी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी बाराव्या शतकात समाजाला दिलेल्या समता, स्त्री-पुरुष समानता, बंधुता, भूतदया आणि



जातीभेद निर्मूलनाच्या संदेशावर सविस्तर प्रकाश टाकला. तत्कालीन सामाजिक परिस्थितीत त्यांनी मांडलेले विचार हे आजच्या आधुनिक समाजासाठीही तितकेच महत्त्वपूर्ण व मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन करण्यात आले. जात-पात, उच्च-नीच भेद दूर करून प्रत्येक मानवाकडे समानतेच्या आणि बंधुभावाच्या दृष्टीने पाहणे, सर्व प्राणिमात्रांप्रती दया बाळगणे आणि समाजात प्रेम व एकोपा निर्माण करणे, हीच सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या विचारांची खरी शिकवण आहे. विद्यार्थ्यांनी अवतार दिनाच्या निमित्ताने या मूल्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## 'दैनिक समर्थ गांवकरी' समूहातर्फे राज्यस्तरीय तीन स्पर्धांचे आयोजन!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

मुंबई : (स. गांवकरी)

"बाप्पा आपल्या संस्कृतीचा... आपल्या एकतेचा... दैनिक समर्थ गांवकरी समूह..." या संकल्पनेतून गणेशोत्सव २०२६ निमित्त दैनिक समर्थ गांवकरी, AVP न्यूज व गांवकरी न्यूज यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रासाठी तीन विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. "परंपरेचा मान... पर्यावरणाचा सन्मान... आपली संस्कृती, आपली जबाबदारी" या विचारातून गणेशोत्सव अधिक संस्कारमय, पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणारा व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या स्पर्धांमध्ये 'माझा बाप्पा' आदर्श गणेश सजावट स्पर्धा २०२६,




'माझी गौराई' आदर्श गौरी सजावट स्पर्धा २०२६ आणि 'पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धा २०२६' यांचा समावेश आहे. प्रत्येक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षिसे देण्यात येणार असून, सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. घरगुती गणेश सजावट, गौरी सजावट तसेच सार्वजनिक गणेश मंडळांनी राबविलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना या स्पर्धेत प्रोत्साहन दिले जाणार आहे.

ही स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिक, कुटुंबे आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी खुली असून कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. स्पर्धकांनी किमान तीन फोटो किंवा व्हिडिओसह आपले नाव, पत्ता, स्पर्धेचे नाव, मोबाईल क्रमांक व व्हॉट्सॲप क्रमांकाची माहिती पाठवावी. सार्वजनिक गणेश मंडळांनी गणेशोत्सवादरम्यान राबविलेल्या सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणपूरक उपक्रमांची माहितीही पाठवावी. फोटो, व्हिडिओ व माहिती व्हॉट्सॲप क्रमांक 94233 88508 / 90045 11593 / 8975157765/ 82865 62340 वर पाठवता येईल.

"उत्सव साजरा करा... पर्यावरण जपा! आपली परंपरा... आपली ओळख... स्वच्छ, सुंदर आणि संस्कारमय महाराष्ट्र!" या संदेशासह महाराष्ट्रातील गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन दैनिक समर्थ गांवकरी, एबीपी न्यूज व गांवकरी न्यूज परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### आयोजक

- दैनिक समर्थ गांवकरी समूह
- समूह संपादक: मा.श्री. नानजीभाई ठक्कर (ठाणावाला)
- संपादक: मा. डॉ. विश्वासराव आरोटे
- कार्यकारी संपादक: मा.श्री. नवनाथजी जाधव
- पुणे निवासी संपादक: मा.श्री. प्रतिक गंगणे
- मुंबई विभागीय संपादक: मा. श्री. दशरथजी चव्हाण
- व्यवस्थापक: मा.श्री. संजय फुलसुंदर

# दहीहंडीच्या मंचावर पाण्याचा मुद्दा गाजला

## 'डिंबे बोगद्याला स्थगिती नाही, पारनेरचा पाणीप्रश्न सुटणारच!' — डॉ. सुजय विखे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्याच्या पाणीप्रश्नाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या डिंबे बोगद्याच्या कामाला कोणतीही स्थगिती आलेली नाही. हे काम कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होणार असून, बोगदा पूर्ण झाल्यानंतर पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याच्या दक्षिण भागाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटण्यास मदत होईल, असा दावा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला.

निघोज येथे संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन, उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली वरखडे मित्रमंडळ व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित पारनेर तालुक्यातील सर्वात मोठ्या ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांच्या दहीहंडी उत्सवात ते बोलत होते. डॉ. विखे म्हणाले, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्या माध्यमातून डिंबे बोगद्याचे काम मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे १६ किलोमीटर लांबीच्या या बोगद्याच्या कामाला स्थगिती असल्याच्या चर्चा केवळ वावड्या असून त्यावर विश्वास ठेवू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

पारनेर तालुका दुष्काळमुक्त करण्याचे दिवंगत माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांचे स्वप्न होते. जिल्ह्याला समान पाणी मिळावे, हीच भूमिका असून डिंबे बोगद्याच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडणार असल्याचेही डॉ. विखे यांनी सांगितले. दरम्यान, निघोजमध्ये झालेल्या दहीहंडी उत्सवाला मोठी गर्दी झाली. प्रसिद्ध नृत्यांगना शबनम पुणेकर यांच्या कार्यक्रमानंतर डॉ. सुजय विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते यांचे वाजतगाजत स्वागत करण्यात आले. त्यांनी ग्रामदैवत श्री मळगंगा मातेचे दर्शन घेतले. रात्री उशिरा पुणे जिल्ह्यातील ओतूर येथील रामराज्य गोविंदा पथकाने उंचच उंच मानवी थर रचत ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांची मानाची दहीहंडी फोडली. यावेळी उपस्थितांनी जल्लोष केला.

आमदार काशिनाथ दाते यांनी आयोजकांचे कौतुक करत निघोज परिसरातील विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याचा उल्लेख केला. सचिन वराळ पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली वरखडे यांनी केले, तर युवा नेते अर्जुन लामखडे यांनी आभार मानले. उपस्थिती : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, विश्वनाथ कोरडे, रखमाजी कापसे, सचिन वराळ पाटील, अतुलराव माने, सुभाष दुधाडे, राहुल शिंदे, दिनेशराव बाबर, वसंतराव चेडे, भास्करराव उचाळे, दत्ता पवार, बबनराव तनपुरे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाडळी आळेच्या विकासाला ७५ लाखांची 'गती'!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- रस्ते, अंगणवाडी अन् मंदिर परिसरातील कामांचे भूमिपूजन-लोकार्पण

पाडळी आळेच्या विकास कामांना आता नव्या गतीची जोड मिळाली असून, तब्बल ७५.३७ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी उत्साहात पार पडले.

गावातील रस्ते, अंगणवाडी इमारत, गावठाणातील जागा आणि श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरातील पेव्हिंग ब्लॉक यांसह विविध कामे पूर्णत्वास गेल्याने त्यांचे लोकार्पण करण्यात आले. तर बेंद वस्ती खडीकरण-मुरमीकरण तसेच ग्रा.मा. ७६१ ते चेतन येवले घर रस्त्याच्या खडीकरण-मुरमीकरणाच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते यांनी ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विकासकामांचा पाठपुरावा सुरूच ठेवण्याची ग्वाही दिली. "गावाचा विकास हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा गटाचा विषय नसून संपूर्ण गावाच्या प्रगतीचा विषय आहे. नागरिकांच्या मागण्या आणि अपेक्षा लक्षात घेऊन विकासकामे सातत्याने मार्गी लावली जातील," असे त्यांनी सांगितले.

७५ लाखांहून अधिकच्या विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात आणि पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. स्थानिक गरजा विकासकामांच्या माध्यमातून पूर्णत्वास येत असल्याने ग्रामस्थांनी आमदार दाते यांचे आभार व्यक्त केले.

# मतांची संख्या नव्हे, विकासाची बांधिलकी महत्त्वाची

## विकासासाठी राजकारण बाजूला ठेवून काम करणार : आ. काशिनाथ दाते सर



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील नांदूर पठार परिसरातील विविध विकासकामांना गती देत पानसरेवस्ती रस्ता व कोठारवस्ती रस्ता या प्रत्येकी १० लाख रुपये खर्चाच्या, एकूण २० लाख रुपयांच्या विकासकामांचा भूमिपूजन समारंभ आमदार काशिनाथ दाते सर यांच्या उपस्थित पार पडला. या रस्त्यांमुळे परिसरातील नागरिकांची दळणवळणाची अडचण दूर होऊन शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर यांनी नांदूर पठारसह पठार भागातील विविध गावांचा वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती ग्रामस्थांना दिली. शेतीच्या पाण्याचा प्रश्न हा या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असल्याने त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत नांदूर पठार गावातून आपल्याला अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाले असतानाही गावाच्या विकासात कोणताही भेदभाव केला जाणार नाही, असे स्पष्ट करत आ. दाते सरांनी "मी ज्या लोकांच्या मतांमुळे निवडून आलो त्यांचाच नव्हे, तर आता संपूर्ण मतदारसंघातील जनतेचा प्रतिनिधी आहे. विकासकाम करताना मी राजकारण कधी डोक्यात ठेवत नाही," अशी स्पष्ट भूमिका मांडली. निवडणुकीतील मतांचा हिशेब न करता जनतेच्या गरजा आणि गावांच्या विकासाला प्राधान्य देणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. नांदूर पठार गावासाठी यापूर्वीही विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली असून, गावातील मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी आवश्यक त्या कामांचा टप्प्याटप्प्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही आ. दाते यांनी दिली. विकासाच्या बाबतीत कोणतेही गाव मागे राहू नये, यासाठी संपूर्ण मतदारसंघात समानतेच्या भूमिकेतून काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी देवराम मगर, धनंजय निमसे, गोपीचंद घुले, वंदना घोलप, राजेंद्र उबाळे, एल. के. झावरे गुरुजी, बी. डी. झावरे सर, घनदाट मामा पतसंस्थेचे अध्यक्ष मोहनदादा घनदाट, पतसंस्थेचे संचालक संजय घोलप, अनिकेत देशमाने, अरुण देवराम आग्रे, अरुण राजदेव, माजी सरपंच हरिभाऊ आहेर, विनायक देशमाने, सचिन आग्रे, जयसिंग देशमाने, राहुल राजदेव, प्रकाश राजदेव, हरिभाऊ पानसरे यांच्यासह परिसरातील विविध गावांचे पदाधिकारी, मुंबईकर मंडळी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते सरांच्या माध्यमातून नांदूर पठार परिसरातील विकासकामांना मिळणारी गती निश्चितच समाधानकारक आहे. विशेष म्हणजे, विकासकामे करताना निवडणुकीतील मतांचा विचार न करता संपूर्ण गावाकडे समानतेच्या भावनेने पाहण्याची त्यांची भूमिका कौतुकास्पद आहे. आमदार दाते सरांनी प्रत्येकाशी आपुलकीने आणि आदराने संवाद साधत दिलेली वागणूक मनाला भावणारी आहे. सामान्य कार्यकर्त्यालाही सन्मानाची वागणूक देणारे आणि विकासाच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून दाते सरांविषयी आमच्या मनात निश्चितच आदर आणि समाधान आहे.

**- राहुल राजदेव, ग्रामस्थ**

# थोडक्यात पण महत्वाचे



## लोकन्यायालयात तब्बल २ कोटी ६४ लाख ३५ हजार ४८९ रुपयांची वसुली

भोकर (स. गांवकरी) : सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच मुंबई उच्च न्यायालय आणि विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार, नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली भोकर येथील जिल्हा न्यायालयात शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले. या लोकन्यायालयात एकूण ४६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, २ कोटी ६४ लाख ३५ हजार ४८९ रुपयांची वसुली करण्यात आली. लोकन्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाची एकूण ४८७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३९ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांतून २ कोटी ६० लाख ४८९ रुपयांची वसुली झाली. तसेच दाखलपूर्व एकूण १ हजार ८६४ प्रकरणांपैकी ७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, त्यातून ४ लाख ३५ हजार रुपयांची वसुली करण्यात आली. न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होण्याबरोबरच पक्षकारांना परस्पर सामोपचारातून वाद मिटविण्याची संधी लोकन्यायालयामुळे मिळाली. त्यामुळे पक्षकारांचा वेळ व खर्च वाचण्यास मदत झाली. लोकन्यायालयाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासीर मोहम्मद सलीम, दिवाणी न्यायाधीश आर. आर. पत्की, पॅनल विधीज्ञ आर. के. चव्हाण, व्ही. ओ. सोमवंशी, जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक सदाशिव ताटीकोंडावार, नितीन कासराळीकर, सर्व न्यायालयीन कर्मचारी, अभिवक्ता संघांचे अध्यक्ष व सदस्य तसेच बँक कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## धूरपताबाई पाटील मुदखेडे यांचे निधन

नायगाव (स. गांवकरी) : सुजलेगाव येथील ज्येष्ठ नागरिक ग. भा. धूरपताबाई बाबाराव पाटील मुदखेडे (वय १०५) यांचे मंगळवारी (दि. १५) दुपारी ३ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटील मुदखेडे परिवारावर शोककळा पसरली आहे. धूरपताबाई या पत्रकार दिगंबर मुदखेडे यांच्या आजी होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार (दि. १६) दुपारी १ वाजता सुजलेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल नातेवाईक, आप्तेष्ट तसेच परिसरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.

## 'विकास अध्ययन' पदव्युत्तर पदविका उद्‌घाटनाचे आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या वतीने 'विकास अध्ययन पदव्युत्तर पदविका' (Post Graduate Diploma in Development Studies) या उपक्रमाच्या ऑनलाईन उद्‌घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा दि.१६ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता ऑनलाईन माध्यमातून (Google Meet) पार पडणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे राहणार आहेत. तर विशेष उपस्थिती म्हणून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची लाभणार आहे. या उद्‌घाटन प्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख, अझिम प्रेमजी विद्यापीठातील मानद प्राध्यापक व विकास अध्ययनाचे अभ्यासक प्रा. नीरज हातेकर हे प्रमुख व्याख्याते म्हणून आपले विचार मांडतील. या ऑनलाईन शैक्षणिक कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व लिंक मिळविण्यासाठी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.



## वंदे मातरम गणेश मंडळात गणरायाची उत्साहात स्थापना

किनवट (स. गांवकरी) : शहरातील मानाचे व प्रतिष्ठेचे समजले जाणारे वंदे मातरम गणेश मंडळात यंदाच्या गणेशोत्सवाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. विधिवत पूजा-अर्चा व धार्मिक विधी पार पाडत गणरायाची मंगलमय वातावरणात स्थापना करण्यात आली. यंदाच्या गणेशोत्सवासाठी मंडळाच्या वतीने मुंबई येथून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती आणण्यात आली आहे. कलात्मक स्वरूपातील ही मनमोहक मूर्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत असून, गणरायाच्या दर्शनासाठी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळ परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली असून, विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गणरायाच्या स्थापनेनंतर उपस्थित मान्यवर व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आरती करून गणरायाचे दर्शन घेतले.

## घरच्यांनी केलेले कौतुक कायम लक्षात राहते : इंजि. संतोष तीरमनवार



किनवट (स. गांवकरी) : मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त १३ सप्टेंबर रोजी गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षाच्या वतीने आदिवासी व बंजारा बहुल भागातील बहुजन समाजातील शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या गुणवंतांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. संतोष तीरमनवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष इसा खान, दादाराव कयापाक, ज्येष्ठ पत्रकार फुलाजी गरड पाटील, माजी सभापती अनिल पाटील कऱ्हाळे व बाळू पाटील पवार उपस्थित होते. यावेळी सुमेघ सरतापे, वैष्णवी पवार, उमेश फाळके, ज्ञानेश्वर काकडे, प्रेमकांत बेद्रे, संकेत मुनेश्वर, डॉ. सचिन मिरासे, शुभम कोकलवार, गजानन सरकुंडे, किरण डोंगरे, राहुल पाटील, अमोल जाधव, निकिता राठोड, भाग्यश्री मडावी, पायल मडावी, डॉ. प्रतिक बेद्रे, धनलाल जाधव, कुणाल डवरे यांच्यासह विविध शासकीय पदांवर नियुक्त झालेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

# सात वर्षे सत्ता, तरीही हाती भोपळा

### खर्डेदिगर (पुनदनगर) विकासाच्या दाव्यांचा बुरखा फाटला



कनाशी : (स. गांवकरी)

सात वर्षांहून अधिक काळ सत्तेची ऊब मिळूनही पुनद खोऱ्यातील खर्डेदिगर (पुनदनगर) गणातील गावांचा विकास रखडलाच असल्याचे सुळे येथील संवाद मेळाव्यात उघड झाले. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी आजही नागरिकांना मेळाव्यात हात जोडावे लागत असतील, तर आमदार नितीन पवार यांच्या विकासाच्या दाव्यांचे करायचे काय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

> १० ते १२ वर्षे तालुक्याची सत्ता उपभोगूनही आज आदिवासी पाड्यावर पाण्याचा थेंब नाही, रस्ता नाही, विजेचा दिवा नाही, निवडणूक तोंडावर आली की मेळावे घेऊन गरीब आदिवासींना गोळा करायचं आणि खोटी आश्वासनं देऊन मतं लुटायची, हा धंदा आता बंद करा. २२०० कोटी रुपये... २२०० कोटी! हा पैसा गेला कुठे? कोणत्या कंत्राटदाराच्या घशात घातला? कागदावर रस्ते दाखवून प्रत्यक्षात चिखलात लोळवणाऱ्यांनो, जि.प. चा निधी कोणत्या नातेवाईकांच्या घरी पोहोचवला याचा श्वेतपत्रिका काढा! आदिवासी समाज आता दुधखुळा राहिलेला नाही. किती दिवस आमच्या भोळेपणाचा फायदा घेऊन आमच्याच जंगल-जमिनीवर तुम्ही महाल बांधणार? येत्या निवडणुकीत जनता या सगळ्याचा हिशेब व्याजासकट वसूल करेल, हे लक्षात ठेवा!
>
> **- राम चौरे, जिल्हाध्यक्ष, आदिवासी काँग्रेस, नाशिक**

सुळे येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरात आमदार पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यात सुळे, जयदर, खडकी, कोसवण, काठरा, सुपले, पुनदनगर, शेरी, भैताणे, बोरपाडा यांसह १४ गावांतील सरपंच व नागरिकांनी प्रश्नांचा पाढाच वाचला. खड्डेमय रस्ते, भीषण पाणीटंचाई, लपंडाव खेळणारी वीज, डॉक्टर नसलेली आरोग्य केंद्रे आणि शेतीच्या अडचणींवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, तक्रारी ऐकल्यानंतर आमदारांनी अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. मात्र हेच निर्देश सात वर्षांपूर्वी दिले असते तर आज ही वेळ आली असती का, असा खोचक सवाल उपस्थित होत आहे. वर्षानुवर्षे प्रश्न प्रलंबित ठेवायचे आणि निवडणूक जवळ आली की निर्देशांचे नाटक करायचे, हाच तर कळवणचा पॅटर्न झाला आहे का? लोकप्रतिनिधीचे यश मंजूर निधीच्या आकड्यांवर नाही, तर गावात झालेल्या प्रत्यक्ष बदलावर ठरते. त्यामुळे अपयशाचे खापर केवळ अधिकाऱ्यांवर फोडून चालणार नाही. आता जनतेला आश्वासन नको, तर निश्चित कालमर्यादा हवी आहे. निर्देशांपेक्षा निकाल द्या अशी एकमुखी मागणी खर्डेदिगर पुनदनगर गटातून होत असून आगामी काळात ही नाराजी राजकीय समीकरणे बदलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ पत्रकार व लेखक शिवाजीराव शिर्के यांचे निधन

पिंपरी, पुणे : (स. गांवकरी)



पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ पत्रकार व लेखक शिवाजीराव अमृतराव शिर्के (वय ८१ वर्षे) यांचे मंगळवारी (दि. १५ सप्टेंबर) निधन झाले. शिवाजीराव शिर्के यांनी पुणे जिल्हा गुणवंत कामगार विकास समिती, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ, फुगेवाडी ज्येष्ठ नागरिक संघ आदी संस्थांचे अध्यक्षपद भूषवले आहे. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण शिर्के यांचे ते वडील होत. तसेच ओबीसी कल्याण विभागाचे सहसंचालक प्रशांत शामराव शिर्के यांचे ते चुलते होत. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिवाजीराव शिर्के यांनी प्रवीण प्रकाशन या संस्थेच्या माध्यमातून "महाराणी येसूबाई यांचा इतिहास" हे पुस्तक प्रकाशित केले असून या पुस्तकाला 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' हे पारितोषिक मिळाले आहे. तसेच 'राजे शिर्के घराण्याचा इतिहास', 'कृष्णाकाठ ते पवनाकाठ' हे आत्मचरित्र कालभैरव, शिरकाण आदी पुस्तके आणि अनेक कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. सातारा जिल्ह्यातील उद्योजकांचा परिचय करून देणारे 'साताऱ्चे रत्न' हे देखील त्यांचे गाजलेले पुस्तक आहे. 'पराचा कावळा', 'ही पैशाची किमया' आदी नाटकांचेही त्यांनी लेखन केले आहे.

## किशोरवयीन मुलींना आरोग्य, आहार व आत्मविश्वासाचे धडे

### जनता ज्युनिअर कॉलेजमध्ये आरोग्य व समुपदेशन मेळावा उत्साहात

नायगाव (बा.) : (स. गांवकरी)



किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासह वाढत्या वयातील शारीरिक व मानसिक बदल, सकस आहार, स्त्रीत्वाशी संबंधित समस्या आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने जनता ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता नववी ते बारावीच्या १४ ते १८ वयोगटातील विद्यार्थिनींसाठी विशेष आरोग्य व समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता ज्युनिअर कॉलेजच्या पर्यवेक्षिका प्रा. सौ. शोभा शिंदे होत्या. यावेळी प्रसिद्ध डॉक्टर सौ. मीनाक्षी गायकवाड व डॉ. सौ. प्रियांका वानोळे यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रा. बाबासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. अध्यक्षीय भाषणातून प्रा. सौ. शोभा शिंदे यांनी विद्यार्थिनींना शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. त्या म्हणाल्या, "मुलींनो, आकाशात उंच भरारी नक्की घ्या; मात्र तुमच्या आयुष्याला दिशा देणारी मूल्यांची दोरी कधीही हातातून सुटू देऊ नका. शिक्षण तुमचे पंख मजबूत करेल, शिस्त योग्य दिशा देईल, संस्कार तुम्हाला जमिनीशी जोडून ठेवतील आणि आत्मविश्वास उंच भरारी घेण्याचे धैर्य देईल."

पतंग आणि मांजाचे उदाहरण देताना त्यांनी पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. "पतंगाला आकाशात उंच उडण्याचे स्वप्न असते; मात्र त्याची भरारी सुरक्षित आणि योग्य दिशेने होण्यासाठी मांजाची गरज असते. त्याचप्रमाणे पालक व शिक्षकांचे नियम हे तुमच्या सुरक्षिततेसाठी आहेत. त्यांना बंधन न मानता आयुष्याला दिशा देणारे मार्गदर्शन समजा," असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य तपासणीसह शंकांचे निरसन

मेळाव्यात तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली. वाढत्या वयातील शारीरिक बदल, मासिक पाळीशी संबंधित समस्या, सकस व संतुलित आहार, मानसिक आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता तसेच स्त्रीत्वाशी निगडित विविध विषयांवर डॉक्टरांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या मनातील विविध प्रश्न व शंकांचेही यावेळी समर्पक निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रिया देशमुख यांनी केले, तर आभार प्रियंका शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सौ. शिवकांता पवळे व सौ. वैशाली मोरे यांनी विशेष सहकार्य केले. मेळाव्यास जनता ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. किशोरवय हा मुलींच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून, या काळात योग्य आरोग्यविषयक माहिती, संतुलित आहार, मानसिक आधार आणि सकारात्मक समुपदेशन मिळणे आवश्यक आहे.

या उद्देशाने आयोजित मेळाव्यामुळे विद्यार्थिनींना आरोग्याबाबत मोकळेपणाने संवाद साधण्याची संधी मिळाली.

## सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे वसुली लिपिक सह कर्मचारी कमतरता

### अनेक कर्मचाऱ्यांनाकडे अतिरिक्त पदभार

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे वसुली लिपिक का सह कार्यालयीन कर्मचारी कमतरता मुळे आहे त्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा पदभार दिल्याने मालमत्ता करसह कार्यालयीन कामकाज खोळंबले असुन तात्काळ मनपा प्रशासनाने कर्मचारी पदे भरून वसुली सह कार्यालयीन कामकाज यांना प्राधान्य द्यावे अशी मागणी होत आहे. मनपाच्या सहा क्षेत्रीय कार्यालय सहा असून इतर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक 19 व 20 साठी सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे मालमत्ता कर धारक जवळपास 33 हजार वर असुन वसुली साठी तिनं करनिरीक्षक व वसुली लिपिक केवळ नऊ असुन एका लिपिक कडे दोन दोन वार्ड देण्यात आले आहेत तर नांदेड शहरातील असलेल्या पाच क्षेत्रीय कार्यालय मध्ये जवळपास 20 ते 25 लिपिक व करनिरीक्षक पाच ते सहा आहेत,तर मनपाच्या मुख्य कार्यालयात अनेक विभागांत मात्र अनेक कर्मचारी कार्यालयीन कामासाठी जास्त आहेत परंतु मनपाच्या इतर क्षेत्रीय कार्यालय तुलनेत नवीन मालमत्ता क्रमांक,नाव परिवर्तन,मालमत्ता कर ,पाणीपट्टी वसुली मध्ये अग्रेसर असलेल्या या क्षेत्रीय कार्यालय कडे मात्र प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्ष करीत रिक्त कार्यालयीन कर्मचारी,व वसुली लिपिक पदे न भरल्याने लोक अदालत व मालमत्ता कर वसुली साठी मात्र प्रशासन सिडको क्षेत्रीय वसुली साठी मात्र तगादा लावला जातो, कार्यालयीन कर्मचारी यांच्या कडे ही आहे त्या कर्मचाऱ्यांना दोन ते तीन कामाच्या पदभार असल्याने आहे त्या कर्मचाऱ्यां कडुन मात्र दैनंदिन कामे खोळंबली आहेत, अतिरिक्त पदभार मुळे आहे ते कर्मचारी मात्र अतिरिक्त कामाचा प्रशासनाने मात्र पुर्ण वेळ सहाय्यक आयुक्त यासह करनिक्षक, वसुली लिपिक,कार्यालयीन कर्मचारी रिक्त पदे तात्काळ भरून नागरीकांच्या कामांना प्राधान्य द्यावे अशी मागणी होत आहे. नवीन नांदेड - मनपाच्या वतीने थकबाकी मालमत्ता वसुली साठी थकबाकी मालमत्ता धारकासाठी 80/टक्के शास्ती सुट साठी राष्ट्रीय लोक अदालत मध्ये आठ वसुली लिपिकांनी केली लाखोंची वसुली मात्र नव्याने पदभार दिलेल्या वसुली लिपिकाची शुन्य टक्के वसुली झाल्याने सहाय्यक आयुक्त यांनी विचारपूस ही केली नाही,उलट वसुली केलेल्या लिपिक यांच्ये अभिनंदन केले..

12 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय अदालत मनपाच्या मुख्य इमारतीत मध्ये मनपाच्या वतीने मालमत्ता कर धारक यांच्या साठी थकबाकी मालमत्ता धारक यांच्या थकीत रकमेवर 80/टक्के सुट देण्यात आली होती यासाठी 3810 मालमत्ता धारक यांच्या कडे थकबाकी वसुलीसाठी नोटिसा वसुली लिपिक यांच्या मार्फत वाटप करण्यात आल्या यात प्रत्येक वसुली लिपिक मार्फत थकबाकी मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली मात्र नव्याने वसुली लिपिक पदभार दिलेल्या या वसुली लिपिक कर्मचाऱ्यां कडे केवळ 109 नोटिसा तर काही जणांना 800 तर 400 अशा प्रमाणे 3810 नोटीस बजावण्यात आल्याचे सांगितले,

तर नवीन पदभार दिलेल्या वसुली लिपिक यांनी 109 नोटिसा वाटप करण्यासाठी कार्यालयीन दोन सेवकांच्या सहाय्याने नोटीसा वार्डातील काही मोजक्या ठिकाणी बजावल्या होत्या.386मालमत्ता धारकांनी लोक अदालत मध्ये सहभागी होऊन 63 लाख13 हजार 485रुपये वसुली रोख व धनादेश व्दारे केली, मात्र या नव्याने नियुक्त वसुली लिपिक यांनी मात्र शुन्य टक्के वसुली मुळे संबंधित अधिकारी यांनी मात्र विचारपूस ही केली नाही .

## बंजारा समाजाला एसटीतुन आरक्षण मिळावे यासाठी रास्ता रोको आंदोलन

अर्धापूर : (स. गांवकरी)



बंजारा समाजाला एसटीतुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील चोरांबा पाटीवर येथे 'रास्ता रोको' आंदोलन दि.१६ मंगळवारी रोजी करण्यात आले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक तब्बल दोन तास ठप्प झाली होती. नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील चोरंबा पाटीवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. विविध गावातून आलेला बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी जिंतूर येथे बंजारा समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावे यासाठी विनोद आडे यांच्या आमरण उपोषणाला पाठींबा देण्यात आला तर अनेक वर्ष पासून बंजारा समाजाला एसटीतुन आरक्षणाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी व बंजारा समाजाचे प्रलंबित प्रश्न मार्गीलावावे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती विकट असून आजही हा समाज वंचित आहे. बंजारा समाजाचा एस.टी. प्रवर्गातून समावेश करून, शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण द्यावे, बंजारा समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करावे, समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वस्तीगृहाची सुविधा देण्यात यावी, बंजारा समाजबांधवांवर होणारे अन्याय व अत्याचार थांबवावेत आदी मागण्या तात्काळ मान्य कराव्यात अशी मागणी यावेळी बंजारा समाजा कडून करण्यात आल्या असून जय सेवालाल, जय बंजारा' अशा जोरदार घोषणा बाजीने परिसर दणाणून गेला होता.

# तामसा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक

## जि.प. बां. उप विभागाच्या पाहणी अहवालाने खळबळ; आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

तामसा : (स. गांवकरी)



हिरकणी कक्ष

तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण व धोकादायक बनली आहे. या धोकादायक इमारतीत रुग्णसेवा सुरू ठेवणे संभाव्य दुर्घटनेला आमंत्रण देण्यासारखे ठरले आहे. जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाच्या पाहणी अहवालाने मोठी खळबळ उडाली असून प्राथमिक आरोग्य केंद्राची सुरक्षित ठिकाणी तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे. परंतु आरोग्य विभागाने त्या गंभीर अहवालाची अध्यापही दखल घेतली नसून एखादी दुर्घटना घडल्यानंतरच आरोग्य विभाग जागे होणार का? असा संतप्त सवाल रुग्णांतून विचारला जात आहे. तामसा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग हदगाव यांनी 24 ऑगस्ट 2026 रोजी पाहणी करुन ही इमारत अत्यंत जीर्ण झाली असून धोकादायक असल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य विभागाला दिला. सन १९८५ ते १९८९ दरम्यान बांधण्यात आलेली ही प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आरसीसी कॉलम, बीम न वापरता थेट दगडी जोत्यावर भिंती बांधून स्लॅब टाकलेली आहे. इमारतीला जवळजवळ ४० ते ५० वर्ष जुनी आहे. भिंतीला तडे, छत गळती, सिमेंट प्लॅस्टर गळून स्लॅबच्या गजाळ्या उघड्या पडल्या, गंज चढला. लाईटचे वायर, बोर्ड लोंबकळत आहेत. शौचालयाची मोडतोड होऊन अत्यंत दुरावस्था झाली असून कधीही स्लॅब अंगावर पडू शकतो, अशी परिस्थिती आहे. छतावर झाडेझुडपे वाढली. अशी भयावह अवस्था सांगण्यासाठी पुरेसे आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने ही इमारत अत्यंत धोकादायक असल्याचे पाहणी अहवालातून स्पष्ट केले. तरीही त्या धोकादायक इमारतीत रुग्णसेवा सुरूच ठेवल्याने आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणाबद्दल नेमके काय बोलावे? हे कळायला मार्गच नाही. इमारतीचा एखादा भाग रुग्ण किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या अंगावर पडून जीवावर बेतले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा सवाल रुग्ण व आरोग्य कर्मचाऱ्यांतून विचारल्या जात आहे. ही इमारत धोकादायक असूनही जिल्हा परिषद बांधकाम विभागाने नुकतीच दहा लाख रुपये खर्चून दुरुस्ती केली. दोन वर्षात दहा वेळा दुरुस्तीच्या नावाखाली लाखों रुपयांची वाट लावली. वारंवार डागडुजी करून संबंधित अधिकारी व गुत्तेदारांनी शासनालाच चूना लावल्याचे स्पष्ट आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेपेक्षा दुरुस्तीच्या नावाखाली खर्चाला प्राधान्य देण्याचा प्रकार किती धक्कादायक आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे.

विशेष म्हणजे तामसा प्राथमिक आरोग्य केंद्राला ऑगस्ट २०२३ लाच विशेष बाब म्हणून 30 खाटाचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. परंतु प्रशासनाच्या उदासीन धोरणाने तीन वर्षानंतरही तामसा प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा कागदावर आहे. ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. एकीकडे आरोग्य सेवा बळकट करण्याच्या घोषणा केल्या जातात, तर दुसरीकडे धोकादायक इमारतीचा प्रश्न सोडवला जात नाही, ही प्रशासनाच्या नियोजनाची शोकांतिका म्हणावी लागेल.

# देशपांडे परिवाराचा 50 वा गणेशोत्सव ठरला विशेष

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची उपस्थिती

ठाणे : (स. गांवकरी)

ठाण्यातील देशपांडे परिवाराच्या गणेशोत्सवाला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या निमित्ताने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी ठाण्यातील कॅडबरी परिसरातील देव कॉर्पोरा येथे पत्नी व मुलीसह उपस्थित राहून गणपती पूजन केले. यावेळी खासदार संजय राऊत, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. गणपती दर्शनानंतर संवाद साधताना रामनाथ कोविंद यांनी जनरेशन झेडच्या ऊर्जेचे आणि प्रतिभेचे कौतुक केले. तरुणांनी आपली ऊर्जा देशाच्या विकासासाठी वापरावी, तसेच मत व्यक्त करताना घटनात्मक व कायदेशीर मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

हिंसक आंदोलने व तोडफोडीमुळे देशाचे नुकसान होते, असा संदेशही त्यांनी दिला.



यावेळी त्यांनी ठाण्याच्या जुन्या आठवणींना उजाळा देत आपल्या संघर्षमय जीवनप्रवासाबद्दल सांगितले. मानसिक तणावावर मात करण्यासाठी योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचे आवाहन करत त्यांनी देशाच्या प्रगती, शांतता, सुख आणि समृद्धीसाठी भगवान गणेशाकडे प्रार्थना केली.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेचे दिवा प्रभागातील कार्यसम्राट नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या घरात विराजमान झालेल्या गणरायाची आकर्षक व सुंदर मूर्ती. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### शेतकऱ्यांना विधानसभा उपसभापती अहिर भेटणार : बाळासाहेब दांगट

शिवनेरी (स. गांवकरी) : लातूर - जनकल्याण महामार्ग संदर्भात विधानसभा उपसभापती सचिन अहिर जुन्नर तालुक्यातील शेतकरी बांधवांना गणेशउत्सव नंतर भेटणार अशी माहिती माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट यांनी सांगितली . याप्रसंगी निलेश दांगट उपस्थित होते . लातूर जनकल्याण महामार्ग बाबत तळेरान , मढ , पारगाव, बगडवाडी , कोल्हेवाडी, सांगणोरे, कोटमवाडी , सीतेवाडी , कोळवाडी, वाटखळ, पांगरी , पिंपळगाव जोगा, डिंगोरे ,आहिनेवाडी, सारणी, रोहकडी, उदापूर , ओतूर व या गावांच्या वाड्यावस्त्या मधील सर्व शेतकरी , अल्पभूधारक शेतकरी सर्व नागरिकांना भेटण्यासाठी येणार आहे . प्रस्तावित महामार्गामुळे होणारे भूसंपादन शेतीवरील परिणाम आणि कुटुंबाच्या उपजीविकेवर निर्माण होणारे प्रश्न , जुन्नर तालुका हा माळशेज परिसर इतिहास काळापासून निसर्गाने नटलेला वनसंपदा व शेतीवर अवलंबून असलेला कृषिप्रधान शेती भाग आहे .या भागातील हजारो हेक्टर सुपीक जमीन , वन्य प्राण्यांचे आदिवास व व शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह धोक्यात येणार आहे . यामुळे शेतकरी, मोल मजुरी कुटुंब बेघर होण्याची भीती वाटत आहे.असे भेटीदरम्यान माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट यांनी विधानसभा उपसभापती सचिन अहिर यांना सांगितले. येथील संबंधित शेतकऱ्यांना भेटून स्वतः जातीने लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. गणेशोत्सवानंतर जुन्नर तालुक्याचा दौरा करणार असल्याचे विधानसभा उपसभापती अहिर यांनी सांगितले.

### अनाधिकृत बांधकामवर सात दिवसात कारवाई करावी

शिवनेरी (स. गांवकरी) : शिवनेरी किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान व जागतिक वारसा स्थळ असल्याने येथील पावित्र्य, ऐतिहासिक मूल्य टिकून ठेवणे ही सर्व यंत्रणाची सामूहिक जबाबदारी आहे. येथील अनाधिकृत बांधकामावर सात दिवसात तात्काळ व कठोर कारवाई करावी असे आदेश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत आदेश दिले आहेत . छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्याच्या रक्षणासाठी किल्ल्याचा बफर झोन मधील सर्व अनाधिकृत बांधकामावर कारवाई होणार आहे. शिवनेरी किल्ला परिसरातील बांधकामे जुनी आहेत की , अलीकडच्या काळात उभारण्यात आली आहेत हे शोधण्यासाठी " केंद्र सरकारच्या नेत्रम ॲपचा वापर केला जाणार आहे. उपगृहाद्वारे मिळालेली छायाचित्रे आणि " राज्य सरकारच्या महास्टॅट यंत्रणेच्या " समन्वयातून या सर्व संरचनाची कालानुक्रमे पातळणी केली जाईल. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधिकारी शिवनेरी परिसराची प्रत्यक्ष पाडताळी पाहणी करतील. संबंधित नियमांचे उल्लंघन करतात का ? याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा लागणार आहे. शिवनेरी किल्ला परिसरातील संरक्षित क्षेत्रात कोणतेही अनाधिकृत बांधकामे खपवून घेतली जाणार नाही अनधिकृत ठरलेल्या संरचनाना नोटीस बजावून सात दिवसात पुनरावलोकन करून कारवाई करावी असे आदेश मंत्रालयामध्ये सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी दिले आहे.

### मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ११० लाभार्थ्यांची तपासणी

ठाणे (स. गांवकरी) : स्थानिक नगरसेविका डॉ. कामिनी आकाश सावंत आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश नामदेवराव राठोड यांच्या संयुक्त पुढाकाराने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, सावंत हॉल, शहापूर येथे मोफत मधुमेह, उच्च रक्तदाब व हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ११० लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान १५ लाभार्थ्यांना मधुमेह, १८ लाभार्थ्यांना उच्च रक्तदाब, तर ८ लाभार्थ्यांना ॲनिमिया असल्याचे निदान झाले. निदान झालेल्या रुग्णांना आवश्यक औषधोपचार सुरू करण्यात आला. तसेच पुढील उपचार, नियमित औषधोपचार आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्याबाबत आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब आणि रक्तक्षय यांसारख्या आजारांचे वेळीच निदान होऊन त्यावर योग्य उपचार सुरू करता यावेत, तसेच नागरिकांमध्ये नियमित आरोग्य तपासणीबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आजारांचे प्राथमिक टप्प्यात निदान झाल्यास पुढील गुंतागुंत टाळण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध आरोग्य सेवांचा लाभ घेऊन नियमित तपासणी करून घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. या शिबिरास नगरसेविका डॉ. कामिनी सावंत, डॉ. रमेश राठोड, तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. योगराज पाटील, समुदाय आरोग्य अधिकारी, तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना नियमित आरोग्य तपासणी करून आजारांचे लवकर निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले.

# तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची मनसेची मागणी



महाराष्ट्र राज्यातील सरकार 8 दिवसाच्या आत जर दुष्काळ तात्काळ जाहीर नाही केल्यास सर्व शेतकरी यांना सोबत घेऊन प्रत्येक तालुके व प्रत्येक जिह्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना मोठ्या ताकदीने रस्त्यावर उतरेल आणि शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून घेतल्या शिवाय राहणार नाही याची सरकारने गांभीर्याने दखल घ्यावी.

**- मल्लिनाथ पाटील, मनसे अक्कलकोट, तालुका अध्यक्ष**

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट तालुका व सोलापूर जिल्ह्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची महाराष्ट्र नव निर्माण सेनेने मागणी केली असून या बाबतचे निवेदन तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने, मनसे नेते दिलीबापू धोत्रे, जिल्हा संपर्क अध्यक्ष ॲड किशोर शिंदे, ॲड सुधीर पाटसकर, जिल्हा अध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट तालुका व सोलापूर जिल्हामध्ये भयंकर दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी पेरणी केलेली विविध पिके पाऊस न आल्यामुळे करपली आहेत.आणि प्रत्येक गावं, वाडी -वस्तीवर, जनावरांना चारा नाही, पिण्याचे पाणी नाही, लोकांना रोजगार नाही. शेतकरी यांच्या मुलांना शाळा, कॉलेजमध्ये, पेपर व शिकवणीचे फी देणेसाठी पैसे नाहीत. त्यासाठी सरकारने ठोस पावले उचलून ज्या ठिकाणी दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या ठिकाणी पिकांचे पंचनामे करणेसाठी व जनावरांना चारा छावणी तात्काळ मंजूर करावे म्हणून तहसीलदार साहेब व जिल्हाअधिकारी साहेबांना आदेश देऊन तात्काळ मदत जाहीर करावे.सध्या सणासुदीचे दिवस असल्यामुळे शेतकरीकडे काही एक दमडी नाही.आता श्री गणपतीचे आगमन झाले आहे. आणि दसरा, दिवाळी सण जवळ येत आहे. या राज्याचे मुख्यमंत्री, कृषीमंत्री, खासदार, आमदार या सर्वांनी मिळून जनतेला आधार दिला पाहिजे.निवेदन देताना मनसे ता. अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, गट अध्यक्ष किणी काशिनाथ मरतुरे, ता. उपाध्यक्ष मल्लिनाथ घंटे, शहर संपर्क अध्यक्ष आदर्श मळगी, शहर उपाध्यक्ष शामराव पाटील, मनसे किणी ढब्बू जाधव, दुधनी शाखा अध्यक्ष मनोज राठोड, बोरीउमरगे शाखा अध्यक्ष काशिनाथ पाटील, कोन्हाळी शाखा उपाध्यक्ष दत्ता घंटे व शेतकरी राचय्या बसय्या स्वामी, परमेश्वरp साखरे, उमेश देडे, नीलकंठ धनशेट्टी, अंदप्पा माळगे, तिप्पणा नागरसे, विकास जाधव, राजू अंगडीकर, कुमार जाधव असे अनेक मनसैनिक व शेतकरी लोक निवेदन देताना तहसील कार्यालयामध्ये उपस्थित होते.

# आउटडोअर लाईटिंगमध्ये स्टाइल आणि टिकाऊपणाचा संगम

मुंबई : (स. गांवकरी)

घराच्या बाहेरील जागा घराच्या विस्ताराचा भाग म्हणून अधिकाधिक वापरल्या जात असताना, या जागांचे सौंदर्य आणि वातावरण खुलवण्यात प्रकाशयोजनेची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन क्रॉम्पटन ग्रीव्हज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने आधुनिक डिझाइन, टिकाऊपणा आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेचा संगम असलेली 'वॉलस्माईल' आउटडोअर डेको वॉल लाईट रेंज बाजारात सादर केली आहे. आधुनिक बाह्य जागांना प्रीमियम आणि आकर्षक लूक देण्याच्या उद्देशाने ही रेंज विकसित करण्यात आली आहे. बाल्कनी, पोर्च, पूलसाइड एरिया, लॉबी, पार्किंग स्पेस तसेच ॲक्सेंट आणि डिस्प्ले लाईटिंगसाठी या वॉल लाईट्सचा वापर करता येणार आहे.




स्लीक सिलिंड्रिकल आकारामुळे लिनीया आउटडोअर भिंतींना आधुनिक आणि देखणा लूक देते. ६ वॅटची ही वॉल लाईट आधुनिक बाह्य सजावटीला पूरक ठरते.

राउंड आणि स्क्वेअर अशा दोन आकारांमध्ये उपलब्ध असलेली नेक्सो ५ वॅटची वॉल लाईट आहे. समकालीन डिझाइनमुळे बाह्य जागांना स्वच्छ आणि सुसंस्कृत लूक मिळतो. ठळक आणि लांबट प्रोफाइल असलेली प्रिझम ४ वॅटची वॉल लाईट आहे. वैशिष्ट्यपूर्ण आकार आणि प्रीमियम लूकमुळे सजावटीला महत्त्व असलेल्या जागांसाठी ती उपयुक्त ठरते.

# 'स्वच्छता ही सेवा–२०२६' अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन

ठाणे : (स. गांवकरी)

- स्वच्छतेत लोकसहभाग वाढविण्यावर भर
- स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, आरोग्य तपासणी व जनजागृती उपक्रम राबविणार

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठाणे जिल्ह्यात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा–२०२६' अभियान राबविण्यात येणार आहे. यावर्षीच्या अभियानाची मध्यवर्ती संकल्पना 'स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' अशी असून, स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी न राहता ती लोकचळवळ बनावी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा, हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड यांच्या समन्वयातून जिल्ह्यात विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, स्थानिक संस्था, महिला बचत गट, युवक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध सामाजिक घटकांचा सक्रिय सहभाग घेण्यात येणार आहे. अभियानांतर्गत जिल्ह्यातील ग्रामपंचायत, सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, बाजारपेठा, शाळा, अंगणवाडी केंद्रे, आरोग्य संस्था, पर्यटन व धार्मिक स्थळे आदी ठिकाणी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अस्वच्छ व वर्दळीची ठिकाणे निश्चित करून त्यांची स्वच्छता करणे, सामूहिक श्रमदान, कचरा संकलन व वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता जनजागृती तसेच शाळा व ग्रामपातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्वच्छता अभियानामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाला विशेष महत्त्व देण्यात येणार आहे. नागरिकांनी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करावा, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी.

# ठाणे जिल्ह्यात 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' ॲपद्वारे खत विक्री सुरळीत

## २० दिवसांत ॲपद्वारे बुकिंग करून २९० मेट्रिक टन खताची विक्री; शेतकऱ्यांना घरबसल्या खत बुकिंगची सुविधा

ठाणे : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' (FFS) ॲपद्वारे ठाणे जिल्ह्यामध्ये दि. २७ ऑगस्ट, २०२६ पासून खत विक्रीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. या नवीन डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या आवश्यक खताचे बुकिंग करता येत असून, बुकिंगनंतर प्राप्त होणारा QR कोड संबंधित निवडलेल्या कृषी सेवा केंद्रावर दाखवून खत खरेदी करता येणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली खत विक्री व वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार योग्य वेळी खत उपलब्ध करून देणे तसेच संपूर्ण खत वितरण व्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन करणे हा FFS प्रणालीचा प्रमुख उद्देश आहे. या प्रणालीमुळे खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना अनावश्यक वेळ खर्च करावा लागणार नाही. तसेच प्रत्यक्ष खत उपलब्धता व विक्री प्रक्रियेबाबत अधिक सुलभता निर्माण होऊन शेतकऱ्यांचा वेळ, श्रम व आर्थिक खर्चाची बचत होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र राज्यात



दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी ठाणे जिल्ह्यासह एकूण सात जिल्ह्यांमध्ये या नवीन प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. ठाणे जिल्ह्यात मागील २० दिवसांच्या कालावधीत FFS ॲपद्वारे बुकिंग करून २९० मेट्रिक टन खताची विक्री करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात FFS प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व निविष्ठा विक्रेते तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच ग्रामसभा व इतर ग्रामस्तरीय कार्यक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना FFS ॲपची माहिती देऊन त्याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना ॲप वापरताना येणाऱ्या अडचणींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय हेल्प डेस्कची निर्मिती करण्यात आली असून, त्यांचे संपर्क क्रमांकही शेतकऱ्यांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' (FFS) हे ॲप Google Play Store वर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी सर्वप्रथम हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाउनलोड करून Agri Stack ID किंवा आधारच्या माध्यमातून नोंदणी करावी. त्यानंतर आपल्या जमिनीची व पिकांची माहिती तपासून खात्री करावी.

Agri Stack ID च्या माध्यमातून लॉगिन केल्यास संबंधित जमिनीची माहिती प्रणालीमध्ये आपोआप उपलब्ध होते. मात्र, आधारच्या माध्यमातून लॉगिन केल्यास जमिनीची माहिती स्वतः भरावी लागते. त्यानंतर आपल्या आवश्यकतेनुसार संबंधित गट निवडून आवश्यक खतासाठी बुकिंग करावे. खत उपलब्ध असलेल्या निविष्ठा विक्रेत्यांच्या यादीमधून शेतकऱ्याला आपल्या सोयीचा विक्रेता निवडता येतो.

बुकिंग प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणारा QR कोड तीन दिवसांसाठी वैध राहणार आहे. या कालावधीत संबंधित कृषी सेवा केंद्रावर QR कोड दाखवून खताची खरेदी करता येईल. त्यानंतर पुन्हा खत खरेदी करावयाची असल्यास नवीन बुकिंग करून नवीन QR कोड प्राप्त करणे आवश्यक आहे.

FFS ॲपच्या माध्यमातून खत बुकिंग व खरेदीची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी अधिक सुलभ, पारदर्शक आणि सोयीस्कर करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी या डिजिटल प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करून आवश्यकतेनुसार ॲपच्या माध्यमातून खताचे बुकिंग करावे व खताची खरेदी करावी, असे आवाहन कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले आहे.

# 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद सज्ज

ठाणे : (स. गांवकरी)

राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ठाणे जिल्ह्यात विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक नियोजन वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी आज, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत दिले. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि




परिणामकारक पद्धतीने उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देवीदास महाजन, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, सर्व गट विकास अधिकारी, सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच सर्व तालुका विभाग प्रमुख उपस्थित होते.

'सेवा संकल्प अभियान' हे नागरिकांना शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळवून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असून, अभियानाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार प्रत्येक तालुका स्तरावर 'सेवा सेतू' अभियानांतर्गत शिबिरांचे आयोजन करून पात्र नागरिकांना विविध शासकीय योजनांचे थेट लाभ उपलब्ध करून देण्याच्या सूचना आहेत.

अभियानाच्या अनुषंगाने 'सेवा माझे योगदान' या उपक्रमांतर्गत गाव व वाडी स्तरावर युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सहभागातून स्थानिक गरजेनुसार रक्तदान, वृक्षारोपण, स्वच्छता, आरोग्य तपासणी, योग-ध्यान, प्लास्टिकमुक्ती, महिला आरोग्य व स्वच्छता, पोषण व ॲनिमिया जनजागृती, जलसंधारण, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, सायबर सुरक्षा, रस्ते सुरक्षा, दिव्यांगजन सहकार्य, मतदार जागृती आणि शासकीय योजनांची माहिती यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील या उपक्रमांसाठी गट विकास अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. तसेच 'सेवा ज्योत यात्रा', 'चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा', 'अंगणवाडी उत्सव', 'आशीर्वादाचा दिवा' आणि 'बदलाची गोष्ट' यांसारख्या उपक्रमांचेही नियोजन करण्यात येणार आहे. अंगणवाडी उत्सवामध्ये माता व बालकांना सहभागी करून आरोग्य व पोषण योजनांची माहिती देणे, अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करणे तसेच लाभार्थी महिलांना योजनांचा झालेला लाभ मांडण्याची संधी देण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. १५ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## जरांगेंच्या १३ पैकी १२ मागण्या मान्य, मुख्यमंत्री फडणवीसांनी स्पष्टच सांगितले

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आज मंगळवारी (१५ सप्टेंबर) मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. १९ सप्टेंबरपासून ते मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहेत. मात्र, त्यांच्या या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. त्यामुळे जरांगे मुंबईत येणार की नाही, त्यांना आंदोलन करता येणार की नाही, असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. परंतु, मनोज जरांगेंनी मुंबईत येऊ नये, असे आता सरकारमधील नेत्यांकडून आणि मंत्र्यांकडून सांगण्यात येत आहेत. मात्र, जरांगे कोणाचेच ऐकत नसल्याचेच दिसून येत आहे. अशातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा जरांगे यांनी मराठी समाजासाठी केलेल्या किती मागण्या मान्य केल्या आहेत, याची माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (१५ सप्टेंबर) मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर सविस्तर भाष्य केले. त्यांनी म्हटले की, न्यायालयाच्या विरोधात जाऊन निर्णय घेतल्यास त्याचा फटका अखेर मराठा समाजालाच बसू शकतो, हेही जरांगे यांना सांगण्यात आले आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात मुंबई आणि पुण्यातील नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, अशा पद्धतीने त्यांनी निर्णय घ्यावा. जरांगे यांनी सरकारसमोर एकूण १३ मागण्या मांडल्या होत्या. त्यापैकी १२ मागण्या मान्य झाल्या आहेत. ज्या मागणीबाबत निर्णय घेणे शक्य नाही, त्यामागे कायदेशीर अडचणी आहेत. त्या मागणीसंदर्भात न्यायालयात प्रकरण सुरू असून, महाधिवक्त्यांचे मत काय आहे, याची माहिती जरांगे यांना देण्यात आली आहे. सरकारने न्यायालयाच्या विरोधात जाऊन एखादा निर्णय घेतल्यास त्याचा परिणाम मराठा समाजाच्या हितावर होऊ शकतो, असेही त्यांना समजावून सांगण्यात आल्याची माहिती फडणवीसांनी दिली.

तसेच, कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. जरांगे यांच्या आंदोलनासंदर्भात पोलिसांकडे आलेला अर्ज सध्या नाकारण्यात आला आहे. पुन्हा अर्ज करण्यात आला असल्यास त्यावर परिस्थिती आणि नियमांच्या आधारे पोलीस निर्णय घेतील. आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी



गणेशोत्सवाच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही आणि उत्सवात कोणतेही विघ्न येणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. तर, जरांगे पाटील यांनी यापूर्वीही आंदोलन केले असून, भविष्यातही आंदोलन करण्याचा त्यांचा अधिकार आहे. मात्र, यावेळी सरकारने त्यांच्या कायदेशीर मागण्या मान्य केल्याचा दावा करत त्यांनी आता पुढील निर्णय घेताना सणासुदीच्या दिवसांचा आणि सामान्य नागरिकांचा विचार करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केला आहे.

## कोल्हापूर येथे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करावे

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागातील महसुली प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी कोल्हापूर येथे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे (एमआरटी) स्वतंत्र खंडपीठ स्थापन करावे, अशी मागणी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले.

कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील महसूलविषयक विविध दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा गतीने निपटारा होण्यासाठी कोल्हापूर येथे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे स्वतंत्र खंडपीठ सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री आबिटकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच कार्यरत आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे स्वतंत्र खंडपीठ सुरू झाल्यास संबंधित जिल्ह्यांतील नागरिकांना महसुली प्रकरणांच्या सुनावणीसाठी दूरवर प्रवास करावा लागणार नाही. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचून त्यांना गतिमान, सुलभ व परिणामकारक न्याय मिळण्यास मदत होईल, असेही मंत्री आबिटकर यांनी म्हटले आहे.

महसुली प्रकरणांचा वाढता भार आणि नागरिकांची सोय लक्षात घेऊन कोल्हापूर येथे स्वतंत्र एमआरटी खंडपीठ स्थापन करण्यास शासनाने प्राधान्याने मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी मंत्री आबिटकर यांनी केली आहे.

## उद्योजक पंकज झंवर यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा

### रामकरण सारडा विद्यार्थी गृहामध्ये श्री गणरायाची स्थापना

### विघ्नहर्त्याच्या कृपेने संस्थेच्या प्रगतीस मंगलमय वातावरण निर्माण होवो : अजित बोरा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

सालाबाद प्रमाणे हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा विद्यार्थी गृहात प्रसिद्ध उद्योजक पंकज सत्यनारायण झंवर सपत्नीक यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना व पूजन करण्यात आले.भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यास विद्यार्थी, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवर अजित बोरा यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रामकरण सारडा विद्यार्थी गृहात श्री गणेशाची स्थापना व पूजनाचा हा सोहळा अत्यंत आनंददायी आणि भक्तिमय वातावरणात पार पडत आहे.विघ्नहर्ता श्री गणरायाच्या कृपेने सर्व विद्यार्थी, शिक्षक व



संस्थेच्या प्रगतीसाठी मंगलमय वातावरण निर्माण होवो, अशी मनोभावे प्रार्थना करतो.

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांना योग्य शिक्षण, संस्कार व मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी होत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. श्री गणेशाच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य व यश लाभो, अशी शुभेच्छा त्यांनी व्यक्त केली.

श्री गणेशाची आरती मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.याप्रसंगी अजित बोरा, बजरंग दरक, राजेश बजाज, सतीश लोढा, सौ. संगीता बजाज, सुशील जाजू, पुरुषोत्तम झंवर, अभिजीत बिहाणी, वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

## गणेशउत्सवात मनोज जरांगेनी मुंबईत आंदोलन करु नये : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### सर्व मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण देण्याची मागणी घटनाबाहय

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

ऐन गणेशउत्सवाच्या काळात मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येवुन आंदोलन करु नये. मुंबई ऐवजी त्यांनी छत्रपती संभाजी नगर येथे आंदोलन करावे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी आंदोलन जरुर करावे परंतु ऐन गणेशउत्सवाच्या काळात मुंबईत येवुन आझाद मैदान येथे आंदोलन करु नये तर मुंबई ऐवजी छत्रपती संभाजीनगर येथे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन करावे. याला मराठा समाजाचा प्रचंड पाठिंबा आहे. छत्रपती संभाजीनगरात त्यांनी आंदोलन करावे. मराठा समाजाच्या आरक्षणाला रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा आहे. आपण सरसकट सर्व मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याची मागणी ही घटनाबाहय मागणी आहे. या मागणीला आमचा पाठिंबा नाही. ज्यांच्या नोंदी कुणबी म्हणुन सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र जरुर दिले पाहिजे. कुणबी म्हणुन ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना ओबीसी आरक्षण दिले पाहिजे. मात्र मराठा समाजाला मराठा जातीच्या नावाने ओबीसी आरक्षण देण्याची मागणी ही घटनाबाहय मागणी आहे. ही मागणी केंद्र आणि राज्य दोन्ही सरकार पूर्ण करु शकत नाही. मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला याचा विचार करावा आणि घटनाबाहय मागणी मनोज जरांगे पाटील यांनी करु नये. आणि धमक्या सरकारला देवु नये. मनोज जरांगे पाटील आमचे मित्र आहेत. मात्र त्यांनी घटनाबाहय मागणी करु नये. असा सल्ला रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला.

आम्ही अनेक आंदोलने केली, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव मराठवाडा विद्यापीठाला मिळाले पाहिजे यासाठी आम्ही १४ वर्षे आंदोलन केले. सरकारची अडचण आम्ही समजु शकलो. सरकारने ठराव केला होता म्हणुन आम्ही आंदोलन केले. १७ वर्षे आंदोलन करत राहिलो. मात्र आंदोलन करीत राहिलो. २००६ साली भोतमांगे परिवाराचे भंडारा जिल्हयातील खैरलांजीमध्ये स्त्री हत्याकांडाच्या निषेधार्थ आम्ही आंदोलन केले. नागपुरमध्ये त्यासाठी पुकारलेल्या आंदोलनात आम्हाला सरकारने पोलीसांनी येवुच दिले नाही. नागपुरमध्ये मला गवई गटाला, प्रकाश आंबेडकरांना, कवाडे सरांनाही पोलीसांनी नागपुरमध्ये येवु दिले नाही. राज्य सरकारद्वारे पोलीस आपली भुमिका घेतात, योग्य मागणीसाठी जरुर आंदोलन केले पाहिजे. लोकांचाही विचार केला पाहिजे. त्यामुळे ऐन गणेशउत्सवाच्या काळात मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईमध्ये आंदोलन करण्याऐवजी छत्रपती संभाजीनगरमध्ये आंदोलन केले पाहिजे असा सल्ला ना. रामदास आठवले यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला. मराठा समाजाला विविध योजनाद्वारा राज्य सरकार मदत



करीत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीला आमचा पाठिंबा आहे. सर्वात प्रथम मीच मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली होती. अनुसुचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला स्वतंत्रपणे आरक्षण दिले पाहिजे. त्यांचे उत्पन्न ८ लाखाच्या आत आहे अशा गरीब मराठयांना आरक्षण दिले पाहिजे. या मागणीली रिपब्लिकन पक्षाचा आहे. मात्र मराठा जातीला कुणबी म्हणुन आरक्षण देण्यात येवू नये. ज्यांची नोंद कुणबी म्हणून आहे त्यांनाच कुणबी ओबीसीचे आरक्षण दिले पाहिजे. मराठा जातीच्या नावाने आरक्षण देता येत नाही. क्षत्रिय आणि ब्राम्हण समाजाला आरक्षण देण्याची तरतुद नाही. मात्र ज्या जातींना आरक्षण मिळत नाही त्या सर्व जातीधर्मीयांसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने ईडब्लुएस आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे १० टक्के आरक्षण सुरु केले आहे.

## गणेशोत्सवानिमित्त दशरथ चव्हाण यांच्यी व विविध मान्यवरांच्यासमवेत भेटी

**नवी मुंबई (समर्थ गांवकरी)**

गणेशोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष तथा दैनिक समर्थ गांवकरीचे मुंबई-कोकण विभागीय संपादक दशरथ चव्हाण यांनी विविध मान्यवरांच्या निवासस्थानी व कार्यालयात भेटी देत गणपती बाप्पाचे दर्शन घेतले आणि मान्यवरांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक रोशन दादा मोरे यांच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. जी. बांडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांची भेट घेऊन त्यांना दैनिक समर्थ गांवकरीचा अंक प्रदान करण्यात आला.

अशोक लेलँडचे जएच् घाडगे, करकरे पॉवर इंडस्ट्रीजचे संचालक वरुण करकरे, मार्केटिंग मॅनेजर कमलेश पारवे, रोशन मोरे, सुनील शेटे, मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या समवेत गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यात आले.

मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले सुनील शेट्टी दाजी यांच्या निवासस्थानीही भेट देऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेत शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच नवी मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर गौरव कानडे, रोबोटिक जॉइंट व रिप्लेसमेंट तज्ज्ञ यांचीही सदिच्छा भेट घेण्यात आली.









## श्रीगोंद्याच्या दोन कन्यांची दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील दोन महिला ज्युदोपटूंनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

११ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीगोंदा येथे झालेल्या आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेत सिद्धी होळकर हिने ७८ किलोपेक्षा अधिक वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर कामिनी देवीकर हिने ६३ ते ७० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवत आपले कौशल्य सिद्ध केले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर दोघींची दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



ग्रामीण भागातील मुलींनी ज्युदोसारख्या आव्हानात्मक खेळात यश मिळवणे ही अभिमानाची बाब असून, सिद्धी आणि कामिनी यांच्या पालकांनी मुलींना दिलेले प्रोत्साहन इतर पालकांसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या यशाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच श्रीगोंदा परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, समिती सदस्य राहुलदादा जगताप व महावीर पटवा, प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, उपप्राचार्य व जिमखाना विभागप्रमुख डॉ. नितीन थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, प्रा. रत्नाकर झिटे तसेच सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या दोन्ही खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ, अनिल होळकर आणि पंढरीनाथ देवीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# वृक्षारोपण हा केवळ उपक्रम नसून भावी पिढ्यांसाठीची गुंतवणूक: रमेश डुंबरे

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने मांदरणे ता. जुन्नर, जि. पुणे येथे भव्य वृक्षारोपण अभियानउत्साहात संपन्न झाले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील २५७छ्ड्ड व छ्उउ स्वयंसेवकांनी सह भाग नोंदवून तबबल ७०० वृक्षांचे रोपण केले.

पर्यावरणाचा समतोल राखणे, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यां मध्ये रुजविणे तसेच हरित आणि शाश्वत भविष्याच्या निर्मितीसाठी युवकांचा सहभाग वाढविणे,या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

मांदरणे गाव परिसरातील भांबेरी टेकडी आणि भामकाई देवराई परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत वृक्षांची लागवड केली. या उपक्रमातून एक वृक्ष अनेक पिढ्यांचे भविष्यहा पर्यावरण पूरक संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्टनंट डॉ. निलेश हांडे यांनी केले. त्यांनी वृक्षारोपणाची आवश्यकता,पर्यावरण संवर्धनातील युवकांची भूमिका आणि एन.एस.एस व एन.सी. सी च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुदर्शन केमिकल लि.पुणे चे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश डुंबरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षांचे पर्यावरणीय आणि सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की,वृक्ष केवळ पर्यावरणाचे संरक्षण करत नाहीत,तर मानवी जीवना साठी आवश्यक असलेले शुद्ध वातावरण, जैवविविधता आणि नैसर्गिक संतुलन टिकवून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही केवळ आजच्या पिढीची गरज नसून, एका पिढीने पुढील पिढीच्या आरोग्यासाठी केलेली मोठी गुंतवणूक आहे. एकविसाव्या शतकात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन हे अत्यंत मोठे पुण्याचे कार्य आहे. एका पिढीने पुढील पिढीसाठी स्वच्छ, सुंदर आणि निरोगी निसर्ग व पर्यावरण जपून ठेवले, तर पुढील पिढी सदैव मागील पिढीच्या ऋणात राहील. त्यामुळे वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता त्याचे सातत्याने संगोपन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे.असे आवाहन त्यांनी केले.प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट अध्यक्षीय मनोगतात म्हणाले,पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसाची किंवा एका संस्थेची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करावी,असे आवाहन त्यांनी केले. सदर अभियानामध्ये ७०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन व निसर्गरक्षणाचा संदेश गावातील नागरिकांना दिला असून या विधायक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरणीय जाणीव आणि सामूहिक कार्याची भावना अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.




सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुवर्णा डुंबरे, विनायक कुंडलिक आणि हेमंत डुंबरे पाटील तसेच NSS व NCC च्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य के. डी.सोनावणे,ए.टी.पाडवी, वसंत गावडे, राहुल पाटील, रमेश काशिदे,सुधीर बोराटे, आशुतोष ठाकरे,रमेश गोपाळे,जनार्दन नाडेकर, अंकुश मोधे,शिक्षकेतर कर्मचारी किरण व ढोमसे निखिल काकडे उपस्थित होते.संतोष वाळेकर,रवी ढमाले,सुजीत नलावडे,मोहन महाकाळ,जालिंदर उकिर्डे, नंदुशेठ भोर,भरत काशीद, घोलप साहेब,पोपटराव नलावडे,सुशील हिंगणे आणि मांदारने गावातील ग्रामस्थही उपस्थित होते.

# कोतूळमध्ये ऋषिपंचमीनिमित्त सामुदायिक अथर्वशीर्ष पठण!

**शेकडो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग; जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाचा पंधरावा उपक्रम!**



**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

कोतूळ (ता. अकोले) : ऋषिपंचमीनिमित्त कोतूळ येथील प्राचीन व नवसाला पावणाऱ्या श्री वरदविनायक देवस्थानात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी पहाटे ६ वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठण भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने आयोजित या उपक्रमाचे यंदाचे पंधरावे वर्ष असून, शेकडो भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

श्री गणेशाची उपासना ऐक्य, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि सामूहिक कार्यक्षमता वाढविणारी असल्याच्या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शंखनाद व ओंकाराच्या गजराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शेकडो भाविकांच्या मुखातून एकाच सुरात झालेल्या अथर्वशीर्ष पठणाने तसेच 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला. 'हरिः नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि।' या मंत्रोच्चाराने वातावरणात चैतन्य निर्माण झाले.

अथर्वशीर्ष पठणाचे नेतृत्व सौ. प्रज्ञा भाटे, विद्या परशुरामी, द्वारका पोखरकर व वर्षा नेवासकर यांनी केले. पठणानंतर सौ. व श्री. देवानंद पोखरकर यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी श्री वरदविनायक देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी पोखरकर दाम्पत्याचा सन्मान केला. तसेच देवस्थानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. ऋषिपंचमीनिमित्त महिलांनी ऋषींचे पूजन केले, तर सौ. विद्या परशुरामी यांनी पोथीवाचन केले.

पहाटेच्या वेळीही ग्रामीण भागातील शेकडो भाविकांची उपस्थिती आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला धार्मिक तसेच सामाजिक स्वरूप प्राप्त झाले. यावेळी डॉ. सुभाष सोमण, डॉ. कपिल कातोरे, सुभाष घाटकर, अनिल पाठक, बाळासाहेब पोखरकर, संभाजी पोखरकर, विशाल बोऱ्हाडे, कुलदीप नेवासकर, विनय समुद्र, अजित आरोटे, अविनाश गिते, सागर सोनुले, निलेश घोडे, प्रबोध भाटे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाला दरवर्षी मिळणारा वाढता प्रतिसाद हा कोतूळच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकात्मतेच्या परंपरेची साक्ष देणारा ठरत आहे.



**माळ्याची चावडी,तोफखाना येथील तोफखाना तरुण मंडळाने गणेश स्थापनेची अहिल्यानगर मध्ये सर्वात मोठी मिरवणूक रथातून काढली होती. यामध्ये आमदार संग्राम भैय्या जगताप , भाजपाचे अध्यक्ष अनिल मोहिते , नगरसेवक सागर मुर्तडकर , मंडळाचे अध्यक्ष सुरज जाधव सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते(फोटो–महेश कांबळे)**



**नगर मधील जंगुभाई तालमीच्या सिद्धेश्वर तरुण मंडळाने हि भव्य गणेश मूर्ती स्थापन केली असून मंडळाचे अध्यक्ष राजू मामा जाधव व मार्गदर्शक उपमहापौर धनजय जाधव आहेत (फोटो–महेश कांबळे)**

# निरंकारी संत समागमात प्रेम, शांती आणि एकत्वाचा संदेश

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या वतीने पुणे झोनचा निरंकारी इंग्लिश मीडियम संत समागम रविवार,१३ सप्टेंबर रोजी महालक्ष्मी लॉन्स,पुणे (खराडी ) श्रद्धा,भक्ती आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाला.या समागमात मोठ्या संख्येने श्रद्धाळू, संत–महात्मा आणि सेवादार सहभागी झाले.यावेळी श्रद्धाळूंना संबोधित करताना राकेश मुटरेजा यांनी प्रेम, शांती आणि एकत्वाचे महत्त्व स्पष्ट केले.ते म्हणाले की,जसे एका छोट्या बीजातून विशाल वृक्ष आणि अनेक वृक्षांतून वनाची निर्मिती होते, त्याच प्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात रुजलेले प्रेम,शांती आणि सद्भावनेचे विचार समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकतात.

निरंकारी प्रदर्शनीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की,ज्या प्रकारे वृक्ष– वेलींच्या वाढीमुळे परिसर पक्षी व जीव–जंतूंसाठी अनुकूल



बनतो,त्याचप्रमाणे सद्गुरुंच्या शिकवणीचे संस्कार जीवनात रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम कुटुंब आणि समाजावरही होतो.युवा वर्गाला सत्संगतीचे महत्त्व समजावून सांगताना माशांचा बाजार व अत्तराचा बाजार यांचे उदाहरण देण्यात आले.संत–महात्म्यांच्या संगतीत राहिल्याने त्यांच्या सकारात्मक विचारांचा आणि आध्यात्मिक वातावरणाचा प्रभाव जीवनावर पडतो, असे त्यांनी सांगितले.परमात्म्याने निर्माण केलेली प्रत्येक रचना पूर्ण आहे.त्यामुळे जीवनातील परिस्थिती सहजतेने स्वीकारून शुकराण्याच्या भावनेने जीवन जगावे,असा संदेशही देण्यात आला.

# श्रीगणेश : संतचिंतनातील अद्वैतदर्शन

## ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

भारतीय अध्यात्मपरंपरेत देवतेचे रूप हे केवळ पूजेचे साधन नसते; त्या रूपामागील तत्त्व जाणून घेण्याचा तो एक मार्ग असतो. संतांनी सगुणाला नाकारले नाही आणि सगुणापुरते स्वतः ला मर्यादितही ठेवले नाही. मूर्तीपासून तत्त्वाकडे, नामरूपापासून आत्मरूपाकडे आणि सगुणापासून निर्गुणाकडे जाणारी अंतर्मुख यात्रा म्हणजे संतचिंतन. म्हणूनच संतांच्या दृष्टीने श्रीगणेश हा केवळ गजवदन देव नसून ज्ञानाचा प्रकाश, चैतन्याची अनुभूती आणि अद्वैत तत्त्वाचा सगुण आविष्कार आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच गणेशतत्त्वाचे अत्यंत गूढ, पण सहज दर्शन घडविले आहे.

**नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।**
**देवा तूंचि गणेशु । सकलमति प्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।**

येथे गणेश म्हणजे बुद्धीला प्रकाश देणारे आत्मतत्त्व आहे. 'आत्मरूपा' आणि 'सकलमति प्रकाशु' या दोन शब्दांत ज्ञानेश्वरांचे गणेशदर्शन सामावले आहे. गणेशाची उपासना म्हणजे केवळ बाह्य पूजाविधी नव्हे, तर अंतर्मनातील अज्ञान दूर करून आत्मस्वरूपाचा प्रकाश अनुभवण्याची साधना होय. ज्ञानेश्वर पुढे गणेशाच्या रूपात काराचे तत्त्व उलगडतात.

**अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकारें ।।**

काराच्या अकार, उकार आणि मकार या तीन मात्रांतून गणेशरूपाचे दर्शन घडते. त्यामुळे गणेश एका आकारापुरता मर्यादित राहत नाही; तो नाद, शब्द, ज्ञान आणि आत्मानुभूतीपर्यंत विस्तारतो. संत नामदेवांच्या अभंगवाणीत गणेशवंदना ही नम्रतेची आणि आत्मसमर्पणाची सुरुवात आहे.

**प्रथम नमन करूं गणनाथा ।**
**उमाशंकराचिया सुता ।**
**चरणावरी ठेवूनि माथा ।**
**साष्टांगीं आंता दंडवत ।।**

देवाच्या चरणी माथा ठेवण्याचा हा भाव केवळ भक्तीचा बाह्य आविष्कार नाही. त्यामागे 'मी'पण सोडण्याची तयारी आहे. अहंकाराचे ओझे खाली ठेवले की भक्ती अंतर्मुख होते. संतांच्या भक्तीत म्हणूनच नमनाला केवळ कर्मकांडाचे नव्हे, तर आत्मशुद्धीचे महत्त्व प्राप्त होते. संत एकनाथ महाराजांच्या एकनाथी भागवतात गणेशाच्या अद्वैतस्वरूपाचे अत्यंत नेमके दर्शन घडते.

**नमन श्रीएकदंता ।**
**एकपणें तूंचि आतां ।**
**एकीं दाविसी अनेकता ।**
**परी एकात्मता न मोडे ।।**

एकच तत्त्व अनेक रूपांत प्रकटते, पण त्यामागील एकात्मता कधीही तुटत नाही, हा अद्वैताचा मूलभूत विचार या ओवीत आहे. बाह्यदृष्टीला जगात अनेकता दिसते; परंतु ज्ञानदृष्टीला त्या अनेकतेत एकच चैतन्य अनुभवास येते. गणेशाचे एकदंत रूप हीच एकत्वाची जाणीव अधिक गहिरी करते.

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गणेशचिंतनात देखील काराला मध्यवर्ती स्थान आहे.

**कार प्रधान रूप गणेशाचे ।**
**हे तिन्ही देवांचे जन्मस्थान ।।**
**अकार तो ब्रह्मा उकार तो विष्णु ।**
**मकार महेश जाणियेला ।।**

गणेशाचे रूप येथे केवळ एका देवतेचे रूप न राहता सृष्टीच्या मूलनादाशी जोडले जाते. अकार, उकार आणि मकार यांत ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे तत्त्व अनुभवले जाते. त्याच तुकाराम महाराजांच्या वाणीत गणपती, शारदा आणि गुरु यांचे नातेही ज्ञानमार्गाशी जोडलेले दिसते.

नमिला गणपती, माऊली शारदा ।
आता गुरुराजा दंडवत ।।
गुरुराया चरणी मस्तक ठेविले ।
आपल्या स्तुतीला द्यावी मती ।।

बुद्धीला दिशा देणारे गणेशतत्त्व, वाणीला अर्थ देणारी शारदा आणि त्या ज्ञानाला अनुभवाची वाट दाखविणारा गुरु– या भावनेतून संतांचा ज्ञानमार्ग स्पष्ट होतो. समर्थ रामदासांच्या दासबोधातील गणेशस्तवनातही गणेशाचे स्वरूप 'बोधरूप' म्हणूनच समोर येते.

**नमोजि गणनायेका । सर्व सिद्धिफळदायेका ।**
**अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ।।**

समर्थांची गणेशाला अंतःकरणात वास करण्याची विनंती आहे. अज्ञान आणि भ्रम दूर झाले की खरी विघ्ने दूर होतात. म्हणून संतांच्या दृष्टीने विघ्नहर्ता गणेश हा केवळ बाह्य संकटांचा नाश करणारा देव नसून अज्ञान, अहंकार, देहाभिमान आणि भ्रम यांचा नाश करणारे बोधतत्त्व आहे. गणेशाच्या रूपातील प्रतीकांकडेही याच अंतर्मुख दृष्टीने पाहता येते. चंचल मनाचे प्रतीक मानला जाणारा मूषक गणेशाच्या अधीन आहे, म्हणजे विवेकाने मनावर मिळविलेले प्रभुत्व.

विशाल उदर व्यापकतेचा, एकदंत एकत्वदृष्टीचा आणि गणेशाचे संपूर्ण रूप सगुणातून निर्गुणाकडे जाणाऱ्या साधनेचा संकेत ठरते. मूर्तीचे रूप तेव्हा केवळ दर्शनापुरते राहत नाही; ते चिंतनाचे माध्यम बनते.

संतांचे गणेशदर्शन आपल्याला मूर्तीपासून आत्म्याकडे घेऊन जाते.



डोळ्यांसमोरचे रूप ही सुरुवात आहे; त्या रूपामागील तत्त्व जाणणे ही साधनेची पुढची पायरी आहे.

श्रीगणेशाला नमस्कार करणे म्हणजे केवळ हात जोडणे नव्हे; अंतर्मनातील अज्ञानाला नमवणे, अहंकाराला चरणी ठेवणे आणि ज्ञानाच्या प्रकाशासाठी मन खुले करणे होय.

श्रीगणेश म्हणजे काराचा नाद, ज्ञानाचा प्रकाश, आत्मरूपाची जाणीव आणि अनेकतेत दडलेली एकात्मता. ज्ञानेश्वरांनी ज्याला 'आत्मरूपा' म्हटले, नामदेवांनी ज्याच्या चरणी माथा ठेवला, एकनाथांनी ज्यात 'एकात्मता' अनुभवली, तुकाराम महाराजांनी ज्याला कारप्रधान मानले आणि समर्थांनी ज्याला 'बोधरूपा' म्हणून वंदिले, तो गणराय बाहेरच्या मूर्तीत जितका आहे तितकाच अंतःकरणातही आहे.

म्हणून श्रीगणरायाच्या चरणी नतमस्तक होताना अंतर्मनातील 'मी' विरघळावे, अज्ञानाचा अंधार दूर व्हावा आणि अंतर्यामी व्यापून असलेल्या त्या एकाच चैतन्याचे दर्शन घडावे हीच संतचिंतनातील श्रीगणेशोपासनेची अद्वैतपूर्ण अनुभूती.

# श्रीगोंदा लॉ कॉलेजमध्ये एलएलएमचा शुभारंभ

## न्यायिक सेवांसाठी स्वतंत्र सेंटरची घोषणा

**राजेंद्रदादा नागवडे यांची घोषणा; एलएलबी प्रथम वर्षाचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात**



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजमध्ये नवीन एलएलएम (LL.M.) अभ्यासक्रमाचा शुभारंभ आणि एलएलबी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तालुक्याच्या ठिकाणी उच्च कायदे शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा शिवाजीराव नागवडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य तसेच सर्वोच्च न्यायालयातील डव्होकेट–ऑन–रेकॉर्ड ड. डॉ. राजेंद्र दत्तात्रय अनभुले उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना ड. डॉ. अनभुले यांनी कायद्याच्या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त, मूलभूत कायदेशीर संकल्पनांची सखोल जाण आणि व्यावसायिक नैतिकता अंगीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. श्रीगोंद्यासारख्या तालुका ठिकाणी उच्च कायदे शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने केलेल्या प्रयत्नांचेही त्यांनी कौतुक केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी न्यायिक सेवा (र्गीवळलळरश्र डर्शीींळलशी) तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी स्वतंत्र सेंटर लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. या उपक्रमामुळे कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दर्जेदार तयारी करण्यासाठी मोठा आधार मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्या डॉ. अंजुला एस. चौबे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात राजेंद्रदादा नागवडे यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध शैक्षणिक संधींचा पुरेपूर उपयोग करून मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर यशस्वी करिअर घडवावे, असे आवाहन केले.कार्यक्रमास श्रीगोंदा बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. जयंत शिंदे, ड. अशोक रोडे, ड. सुनील बोस, ड. अशोक वाळुंज, ड. झराड, ड. संग्राम देशमुख, संस्थेचे इन्स्पेक्टर सूर्यभान गोलांडे, एसजीपी कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे यांच्यासह प्रा. पी. जे. फाटे, डॉ. दिपाली जावळे, प्रा. रुपाली गोळे, ग्रंथपाल संदीप अवचिते, अर्पित रनसिंग, क्षितिज शितोळे आणि आदित्य दानवे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रुपाली गोळे यांनी केले, तर आभार ॲड. अशोक रोडे यांनी मानले. नवीन एलएलएम अभ्यासक्रमाच्या प्रारंभामुळे श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजच्या शैक्षणिक वाटचालीत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासह न्यायिक सेवा आणि स्पर्धा परीक्षांच्या नव्या संधींचे दालन खुले झाले आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# पारनेर शहर पाणीटंचाईसह चारा, वीजपश्नी आ. दातेंचा पाठपुरावा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्यासह शेतकऱ्यांच्या चारा व वीज प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख उद्गव असलेला हंगा तलाव सध्या कोरडा पडला असल्याने आगामी काळात शहरावर पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. शहराची लोकसंख्या लक्षात घेता टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आल्यास केवळ पारनेर शहरासाठी दररोज ६० ते ६५ टँकर खेपा कराव्या लागतील, अशी वस्तुस्थिती आ. दाते सरांनी बैठकीत मांडली. टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्यासाठी वापरला जाणारा कोहकडी येथील जलस्रोत पारनेर शहरापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर असल्याने तेथून टँकर भरण्यास मोठ्या प्रमाणात वेळ व आर्थिक खर्च होणार आहे. त्यामुळे वेळ व आर्थिक बचत लक्षात घेऊन कोहकडीऐवजी एमआयडीसीच्या उद्भवातून पारनेर शहरासाठी टँकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

आ. दाते सरांच्या मागणीची पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित यंत्रणेला उद्भव बदलण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे आगामी टंचाईच्या काळात पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुकर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, पावसाने दडी मारल्याने आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता असल्याचे आ. दाते सरांनी निदर्शनास आणून दिले. टंचाईच्या परिस्थितीत जनावरे व शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने ठोस निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली. यावर पालकमंत्री विखे पाटील यांनी चारा छावण्यांऐवजी जनावरांच्या संख्येनुसार शेतकऱ्यांना थेट डीबीटीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे सांगितले.

मतदारसंघातील शेतकऱ्यांना सातत्याने वीजपुरवठ्याच्या समस्या भेडसावत असल्याचेही आ. दाते सरांनी बैठकीत स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या शेतीपंपांसह वीजपुरवठ्याशी संबंधित अडचणी तातडीने दूर करून वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी पालकमंत्र्यांनी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, महानगरपालिका आयुक्त डांगे, उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे खातेप्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



> मतदारसंघात निर्माण होणाऱ्या संभाव्य टंचाईच्या परिस्थितीवर प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. पिण्याच्या पाण्यासह जनावरांचा चारा आणि शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्नही गांभीर्याने घेतला असून, कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. टंचाईच्या काळात प्रत्येक गावाच्या गरजेनुसार पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना केल्या जातील. संकटाच्या काळात मी आपल्या सोबत खंबीरपणे उभा आहे.
>
> **–आमदार काशिनाथ दाते सर (पारनेर–नगर विधानसभा)**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामीचा अवतारदिन राहुरीत उत्साहात साजरा



**राहुरी/प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)**

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी समानतेची शिकवण दिली त्यांचे कार्य अलौकिक असे गौरवोद्गार तहसीलदार डॉ.अमितजी पवार काढले.

राहुरी तहसील कार्यालयात महानुभाव पंथाचे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा ८०६ वा प्रकट दिन शासकीय व निमशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महानुभव शिक्षण संस्थेचे बांबोरी येथील प्रमुख आचार्य श्री ऋषिराजजी शास्त्री मामाजी यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी तहसील कार्यालयात तहसीलदार डॉ.अमित पवार यांच्या हस्ते सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामीं च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी बाबासाहेब लांबे, उद्योजक रवींद्रजी कोरडे, पिंपरी अवघड येथील मा.सरपंच संदीप लांबे तेली समाजाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय सोनवणे, रितेश लांबे, राजेंद्र पानसंबळ, पप्पू महानुभाव, दीपक लांबे किशोर पेरणे आणि संदीप सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी रितेश लांबे यांनी सर्वज्ञ स्वामीची माहिति सांगितली तहसीलदार पवार यांचा सन्मान उपदेशी बांधवांच्या वतीने करण्यात आला यावेळी तहसील कार्यालयातील श्री .खामकर भाऊसाहेब आदी मान्यवर उपस्थित होते तसेच आभार संदीप सोनवणे यांनी मांनले.

### कै. रंजना (राधाबाई) भरत आरोटे यांचे निधन!

**मेहेंदुरी (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील मेहेंदुरी, ता. अकोले येथील सौ. रंजना (राधाबाई) भरत आरोटे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मोहटे व आरोटे परिवारासह नातेवाईक, आप्तेष्ट व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. अत्यंत मनमिळाऊ आणि प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी परिवार व नातेवाईकांमध्ये आपुलकीचे स्थान निर्माण केले होते.अकोले पंचायत समितीचे अधिकारी सुनिल मोहटे. प्रगतशील शेतकरी किसन मोहटे बाळासाहेब मोहटे अनिल मोहटे नारायण मोहटे यांच्या त्या भगिनी होत

त्यांच्या पश्चात पती भरत धोंडीबा आरोटे, मुलगा प्रविण भरत आरोटे, मुलगी ज्योती गणेश कासार, जावई गणेश भाऊसाहेब कासार, नातू विहान गणेश कासार तसेच भाऊ, दीर, पुतणे, सुना व मोठा आप्तपरिवार आहे. कुटुंबीयांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा देत, आता सहवास जरी नसला तरी स्मृती सुगंध देत राहील, जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

कै. रंजना आरोटे यांचा दशक्रिया विधी बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता मेहेंदुरी अमरधाम, प्रवरा नदीतीरी, ता. अकोले येथे होणार आहे. यावेळी ह.भ.प. रोहिणीताई गडकरी (सुलतानपूर) यांची प्रवचनसेवा होणार आहे. समस्त आरोटे परिवार व नातेवाईक, मेहेंदुरी यांच्या वतीने कै. रंजना आरोटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### संगमनेरात महायुतीच्या अनाधिकृत फ्लेक्सबाजीमुळे गणेश भक्तांमध्ये मोठी नाराजी



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर हे वैभवशाली आणि आर्थिक संपन्न बनले आहे. शेतकरी व्यापारी विद्यार्थी नागरिक महिला या सर्वांसाठी हे शहर अत्यंत वैभवशाली असून गणेश उत्सवानिमित्त संगमनेर शहरात नागरिकांची मोठी गर्दी झाली मात्र महायुतीच्या अनाधिकृत फ्लेक्समुळे वाहतूक कोंडीसह शहराचे विद्रूपीकरण होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

संगमनेर शहर हे सुसंस्कृत व आर्थिक दृष्ट्या संपन्न शहर म्हणून ओळखले जाते यामुळे नागरिकांची राहण्यासाठी शहरांमध्ये पहिली पसंती आहे याचबरोबर मोठी बाजारपेठ विश्वास प्रामाणिकपणा यामुळे आजूबाजूच्या तालुक्यांमधील नागरिक ही खरेदीसाठी मोठ्या संख्येने संगमनेर शहर मध्ये येत असतात दररोज सुमारे दोन लाख नागरिकांची वर्दळ शहरांमध्ये असते.

# टाकळी ढोकेश्वर–कान्हूर पठार घाटात आयशर टेम्पो पलटी

- वारंवार अपघात होत असल्याने घाटातील धोकादायक वळण काढण्याची मागणी
- राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके अपघातस्थळी

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

रांजणगाव एमआयडीसी येथून पारनेरमार्गे टाकळी ढोकेश्वर–कान्हूर पठार रस्त्याने नाशिककडे जात असलेला आयशर टेम्पो (क्र. एमएच ०४ जीआर ११०७) टाकळी ढोकेश्वर–कान्हूर पठार दरम्यानच्या घाटातील धोकादायक वळणावर मंगळवार दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

टाकळी ढोकेश्वर व कान्हूर पठारदरम्यानचा हा घाट अतिशय वळणदार असून, या मार्गावर वाहनचालकांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. घाटातील तीव्र



वळणे आणि रस्त्याची रचना यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे हा घाट आता ‘अपघातांना निमंत्रण देणारा घाट’ म्हणून ओळख निर्माण करू लागला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक लंके यांनी अपघातस्थळी भेट देऊन पाहणी केली.

# पाण्याअभावी पारनेर शहराचा विकास खुंटला : माजी नगराध्यक्ष विजय औटी

**२९ सप्टेंबरला लाल चौकात आमरण उपोषण; पाणीप्रश्न सुटेपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार**
**उपोषणा संदर्भात पारनेर येथे पत्रकार परिषद**

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पाण्याअभावी पारनेर शहराचा विकास खुंटला असून, शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागल्यास शहराच्या विकासाला गती मिळेल. त्यामुळे पारनेर शहरातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचा बनलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी पारनेर शहरातील लाल चौक, खालची वेस येथे आमरण उपोषणास बसणार असल्याची घोषणा माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी पत्रकार परिषदेत केली.

पारनेर शहरात सध्या दहा ते बारा दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असून, अनेक वेळा अतिशय गढूळ पाणी नागरिकांना मिळते. हे पाणी पिण्यायोग्य तसेच वापरण्यायोग्य नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील पाणीप्रश्नाबरोबरच अनेक मूलभूत प्रश्न अद्यापही कायम आहेत. महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी तसेच शहरातील विविध शासकीय कामांसाठी तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे, या उद्देशाने आपण राजकारणविरहित सामाजिक दृष्टिकोनातून हे आंदोलन करणार असल्याचे औटी यांनी सांगितले.

पारनेर नगरपंचायत हद्दीतील



नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शहरासाठी पिण्याच्या पाण्याची योजना तातडीने मंजूर करून तिची प्रभावी अंमलबजावणी करावी, ही प्रमुख मागणी आहे. शासन व प्रशासनाने या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पाणीप्रश्नावर ठोस तोडगा निघाल्याशिवाय उपोषणातून माघार घेणार नसल्याचा निर्धारही विजय औटी यांनी व्यक्त केला.

पत्रकार परिषदेनंतर उपोषणासंदर्भातील निवेदन संबंधित प्रशासनाला देण्यात आले. पारनेर येथे झालेल्या पत्रकार परिषदेला माजी नगराध्यक्ष विजूभाऊ औटी, यांच्यासह माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे, माजी नगरसेवक नंदकुमार देशमुख, माजी नगरसेवक किसन गंधाडे, माजी नगरसेवक विशाल शिंदे, माजी नगरसेवक मुदस्सर सय्यद, बाजार समितीचे संचालक शंकर नगरे, माजी नगरसेवक नंदकुमार औटी, ज्येष्ठ नेते बाळासाहेब औटी, युवा नेते नितीन औटी, उपस्थित होते.

# कळस बु. येथे १६ सप्टेंबरपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार यांची उपस्थिती**

**अकोले (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे मानलेले, अमृतवाहिनी प्रवरा मातेच्या तिरावर वसलेल्या श्रीक्षेत्र कळस बु., ता. अकोले येथे श्री कळसेश्वर कृपेने व परमपूज्य ब्रह्मलीन सुभाषपुरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. १६ सप्टेंबर ते बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

गणेशोत्सवाच्या पावन पर्व काळात ऋषीपंचमी ते वामन जयंती या तिथीनुसार संपन्न होणाऱ्या या सप्ताहामध्ये महाराष्टातील नामवंत प्रवचनकार व कीर्तनकारांची उपस्थिती असून अनुक्रमे पुढील प्रमाणे बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी ह.भ.प. संस्कृतीताई वाकचौरे, कळसकर व कळसेश्वर देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त ह.भ.प. देवराम महाराज वाकचौरे (सर), गुरुवार दि. १७ रोजी ह.भ.प. रोहिणीताई गडकरी व वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम, छोटे माऊली, शुक्रवार दि. १८ रोजी ध्येयपूर्ती वारकरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ह.भ.प. सुनिताताई कातोरे व ह.भ.प. महादेव महाराज राऊत, शनिवार दि. १९ रोजी कळस वारकरी भूषण ह.भ.प. अरुण महाराज शिर्के व कोतुळेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. नितीन महाराज गोडसे, रविवार दि. २० रोजी अगस्ती देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त ह.भ.प. दीपक महाराज देशमुख व गाथा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक ह.भ.प. वैभव महाराज राक्षे, सोमवार दि. २१ रोजी अगस्ती देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त ह.भ.प. गणेश महाराज वाकचौरे व भागवताचार्य ह.भ.प. अशोक महाराज ईगल शास्त्री, तर मंगळवार दि. २२ रोजी अगस्ती देवस्थान ट्रस्ट चे माजी विश्वस्त ह.भ.प. विष्णूपंत महाराज वाकचौरे व वारकरीरत्न ह.भ.प. चैतन्य महाराज निंबोळे यांचे तर बुधवार दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ११ वाजता काल्याचे कीर्तन ह.भ.प. कीर्तनकेसरी देविदास महाराज निवळीकर (जालना) यांचे होणार आहे.

# श्रीराम साधना आश्रमाचे महंत श्री सुनीलगिरी महाराजांचे बारा दिवशीय मौन व्रत व अनुष्ठान सुरु

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख गुरुवर्य महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या बारा दिवशीय मौन व्रत व अनुष्ठान शुभारंभ गणरायाच्या आगमनापासून करण्यात आला. अनंत चतुर्दशी पर्यंत हे मौन व्रत अनुष्ठान चालणार आहे. धर्माचे वैभव वाढावे यासाठी माझे हे मौन व्रत अनुष्ठान मागचा मुळ उद्देश असल्याचे प्रतिपादन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी या प्रसंगी बोलतांना केला

प्रभु रामचंद्र,प.पू.ब्रम्हलिन योगिराज प्रल्हादगिरीजी महाराज,ब्रम्हलिन सद्गुरु स्वामी प्रकाशगिरीजी महाराज यांच्या



कृपा आशिर्वादाने व देवगडचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २६ वर्षांपासून गणेशोत्सवानिमित्त गुरुवर्य महंत सुनिलगिरीजी महाराज यांचे मौन व्रत व अनुष्ठान हे या कालावधीत सुरू रहाणार आहे. अनुष्ठान व मौन व्रत शुभारंभ प्रसंगी महंत श्री सुनीलगिरी महाराजांनी श्रीराम साधना आश्रमातील प्रभू रामचंद्र भगवंताचे व येथेच स्थापित झालेल्या बारा जोतिर्लिंगाचे दर्शन घेतले.

यावेळी बोलतांना साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य म्हणाल्या की महंत स्वामी श्री सुनीलगिरीजी महाराज यांनी सुरू केलेले धर्म कार्य हे धर्म जागृतीसाठी असून भाविकांमध्ये त्यामुळे आध्यात्मिकता वाढीस लागली आहे, धर्म जनजागृतीसाठी त्यांचे कार्य मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# अक्षरांपासून शब्दांपर्यंत संख्यांपासून विचारांपर्यंत!

## पोदार प्रेप, संगमनेरमध्ये रंगला "Literacy Numeracy Mela 2026'चा आनंदमय शिक्षणसोहळा!

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

खेळता खेळता शिकूया अनुभवातून समजून घेऊया! या संकल्पनेतून पोदार प्रेप, संगमनेर येथे ‘Learn Through Sounds, Count Through Fun!’ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमाला प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा, मुख्याध्यापिका मयुरा निजामपुरकर, SDC सदस्य, पालक, शिक्षक तसेच चिमुकल्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन व रिबन कटिंग सोहळा पार पडला.

यावेळी मुख्याध्यापिका मयुरा निजामपुरकर यांनी मेळाव्याची संकल्पना, उद्देश आणि मुलांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व स्पष्ट केले. ध्वनी, भाषा, संख्या आणि तर्कशक्ती यांचा खेळकर व कृतीआधारित शिक्षणाशी मेळ साधल्यास मुलांची शिकण्याची गोडी अधिक वाढते, असे त्यांनी सांगितले. मुलांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाची भक्कम पायाभरणी करणे, शिक्षण प्रक्रिया आनंददायी व अनुभवाधारित बनविणे आणि पालकांना मुलांच्या शिकण्याच्या प्रवासात सहभागी करून घेणे, हा या मेळाव्यामागील प्रमुख उद्देश होता.

मेळाव्यात विविध कृतीआधारित व अनुभवात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अक्षरे, ध्वनी, शब्द, वाचन, मोजणी, संख्या, नमुने, क्रम, बेरीज तसेच समस्या सोडविणे यांसारख्या संकल्पना मुलांनी खेळातून आत्मसात केल्या. Symphonicsच्या माध्यमातून ध्वनी, अक्षरओळख, शब्दनिर्मिती व भाषिक कौशल्यांचा अनुभव मुलांना मिळाला, तर छींलशी चरसळलच्या माध्यमातून मोजणी, संख्या, नमुने, क्रम आणि तर्कशक्तीचा खेळकर पद्धतीने परिचय करून देण्यात आला.

याशिवाय –Child Interactive Activities, Parent Conversation Corner, Photo Corner, Parent Feedback Corner उभारण्यात आले होते. पालकांनी आपल्या पाल्यांसोबत उत्स्फूर्त सहभाग घेत विविध उपक्रमांचा आनंद घेतला. मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेचे प्रत्यक्ष निरीक्षण करताना पालकांनाही आनंददायी व अर्थपूर्ण अनुभव मिळाला.

शिकणे म्हणजे केवळ पाठांतर नव्हे, तर अनुभवातून समजून घेणे, हा संदेश या संपूर्ण मेळाव्यातून प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आला. खेळ, कृती, संवाद आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्या माध्यमातून मुलांमध्ये शिकण्याची उत्सुकता निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अथक परिश्रम, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि चिमुकल्यांचा आनंदी सहभाग यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पालकांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना मुलांना आनंददायी वातावरणात शिकण्याची आणि शिकलेले प्रत्यक्ष कृतीतून अनुभवण्याची संधी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यामुळे Literacy Numeracy चशश्रर २०२६ हा मुलांसाठी शिकण्याचा, पालकांसाठी अनुभवण्याचा आणि शिक्षकांसाठी आपल्या प्रयत्नांचे फलित पाहण्याचा एक आनंदमय व संस्मरणीय शिक्षणसोहळा ठरला.



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## उत्कृष्ट कामगिरीची दखल

### पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव



**अकोले (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या दहशतवादविरोधी पथकात कार्यरत असताना उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी बजावणारे पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांचा अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

दहशतवादविरोधी पथक, अहिल्यानगर येथे कामकाज करत असताना जिल्ह्यातील गोपनीय तसेच उच्च कामकाजामध्ये मोलाची कामगिरी बजावल्याबद्दल त्यांच्या कार्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यास मोलाची मदत झाली.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. श्री. मुमक्का सुदर्शन (भा.पो.से.) यांच्या हस्ते पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि उल्लेखनीय कार्याचे कौतुक करण्यात आले. वरिष्ठांकडून मिळालेल्या या सन्मानामुळे पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांच्या कार्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## राजाराम गायकर यांचे दुःखद निधन

**ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)**



येथील ज्येष्ठ नागरिक राजाराम गायकर (वय ७६) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने ब्राम्हणवाडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राजाराम गायकर हे शांत, मनमिळावू व प्रेमळ स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. कुटुंबीय, नातेवाईक व आप्तेष्टांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, तीन बहिणी, पुतणे असा परिवार आहे. विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री तथा प्रवक्ते शंकर गायकर यांचे ते चुलत बंधू होत.

राजाराम गायकर यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व ग्रामस्थांनी शोक व्यक्त करून गायकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

## गणरायाच्या दर्शनासाठी अमृता फडणवीस महापौर निवासस्थानी; तावडे कुटुंबीयांकडून स्वागत



**मुंबई (समर्थ गांवकरी)**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबईच्या भायखळा येथील महापौर निवासस्थानी सदिच्छा भेट देत श्रीगणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.

महापौर रितू राजेश तावडे यांच्या निवासस्थानी आगमन झाल्यानंतर तावडे कुटुंबीयांच्या वतीने अमृता फडणवीस यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी बाप्पाची आरती करून सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

## राज्यपालांनी घेतले लालबागच्या राजाचे दर्शन




**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज 'लालबागच्या राजा'चे दर्शन घेतले. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यपालांचे स्वागत केले.

# ढोल-ताशांचा गजर, लावणीचा ठेका, अन् सर्जा-राजाची दिमाखदार स्वारी!

## कान्हूरपठारचा श्रावणी बैलपोळा ठरला लोकसंस्कृतीचा जल्लोष..
## गौराई यात्रा व कुस्ती आखाड्याने उत्सवाला वेगळीच रंगत..

**निघोज (समर्थ गांवकरी)**

बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा निनाद... ढोल-ताशांचा कडकडाट... लावणीच्या ठेक्यावर थिरकणारी तरुणाई... आकाशात रंगणारी फटाक्यांची आतषबाजी... विद्युत रोषणाई आणि सजलेल्या सर्जा-राजाच्या दिमाखदार जोड्या! अशा जल्लोषी वातावरणात कान्हूर-पठारचा राज्यातला सगळ्यात मोठा, प्रसिद्ध श्रावणी बैलपोळा गुरुवारी (दि. १०) मोठ्या उत्साहात साजरा झाला. हजारो ग्रामस्थ, महिला, शेतकरी आणि तरुणाईच्या उत्स्फूर्त सहभागा मुळे संपूर्ण कान्हूर-पठारला जणू लोकसंस्कृतीच्या महाउत्सवाचे रूप प्राप्त झाले होते.

शेतकऱ्याच्या जीवनात बैल म्हणजे केवळ शेतीकामाचे साधन नाही; तर वर्षभर शेतात खांद्याला खांदा लावून राबणारा कुटुंबातील जिव्हाळ्याचा सोबती आहे. याच मुक्या साथीदाराच्या श्रमाचे ऋण मान्य करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा कान्हूर-पठारमध्ये केवळ सण म्हणून साजरा होत नाही, तर तो मातीशी आणि शेतीशी असलेल्या नात्याचा उत्सव म्हणून जगला जातो.

**सकाळपासून सर्जा-राजाच्या सजावटीची लगबग**

पोळ्याच्या दिवशी सकाळपासूनच गावातील शेतकरी कुटुंबांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. बैलांना स्वच्छ अंघोळ घालून शिंगांना आकर्षक रंग देण्यात आले. अंगावर झूल,गळ्यात घुंगरांच्या माळा आणि विविध अलंकारांनी बैलजोड्यांना सजविण्यात आले. पारंपरिक तसेच आधुनिक रंगसंगतीच्या आकर्षक सजावटीमुळे प्रत्येक बैलजोडी लक्षवेधी ठरत होती.

सजावट पूर्ण झाल्यानंतर बैलांची विधिवत पूजा, औक्षण व नैवेद्य अर्पण करून शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाचा सन्मान केला. नांगरणी, पेरणी, मशागत अशा वर्षभराच्या शेतीच्या कामात साथ देणाऱ्या बैलांसाठी पोळा म्हणजे त्यांच्या कष्टाला मानाचा मुजरा करण्याचा दिवस ठरला.

**मानाच्या बैलजोडीने मिरवणुकीला सुरुवात**

सायंकाळी सहाच्या सुमारास सुभाष पाटील ठुबे आणि बाळासाहेब ठुबे यांच्या सजविलेल्या मानाच्या बैलजोडीची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर इतर शेतकऱ्यांच्या बैलजोड्यांनीही मिरवणुकीत सहभाग घेतला. मानाच्या बैलांनी मुख्य चौकात येऊन मारुती मंदिराचे दर्शन घेतले. यावेळी मानाच्या बैलमालकांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करून बैलांचे औक्षण करण्यात आले.

त्यानंतर मिरवणुकीला खऱ्या अर्थाने रंगत आली. बैलांच्या पुढे लावणीचा ठेका, ढोल-ताशांचा प्रचंड गजर आणि मागे हजारोंचा जनसमुदाय, असे चित्र पाहायला मिळाले. पारंपरिक वाद्यांच्या तालावर तरुणाई थिरकत होती, तर फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर दुमदुमून गेला. सजविलेल्या बैलजोड्या आणि त्यांच्यासोबत सहभागी झालेल्या शेतकरी कुटुंबांमुळे गावच्या रस्त्यांना उत्सवाचे रूप आले.

**यंत्रयुगातही नाते 'माती'शीच!**

आज शेतीमध्ये ट्रॅक्टर, आधुनिक अवजारे आणि यंत्रसामग्रीचा वापर वाढला आहे. त्यामुळे बैलांवरील शेतीची प्रत्यक्ष कामाची जबाबदारी काही प्रमाणात कमी झाली असली, तरी शेतकरी आणि बैल यांच्यातील भावनिक नाते मात्र तसूभरही कमी झालेले नाही. कान्हूर-पठारचा पोळा या नात्याचीच जिवंत साक्ष ठरला. हा उत्सव केवळ बैलांची सजावट, पूजा आणि मिरवणुकीपुरता मर्यादित नाही. तो शेतकऱ्याच्या श्रमाचा सन्मान, शेतीच्या परंपरेला सलाम आणि मुक्या जीवाच्या योगदानाची जाणीव करून देणारा उत्सव आहे.

बदलत्या काळातही ग्रामीण जीवनमूल्ये, शेतकरी संस्कृती आणि आपल्या मातीशी असलेली नाळ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम कान्हूर-पठारचा बैलपोळा करत आहे. पोळ्याच्या निमित्ताने नव्या पिढीला शेतीचे महत्त्व, श्रमाचे मूल्य आणि पशुधनाविषयीची संवेदनशीलताही अनुभवायला मिळते. दोन दिवसांचा उत्सव;दुसऱ्या दिवशी गौराई यात्रा आणि जंगी आखाडा आयोजित केला आहे.

कान्हूर-पठारचा उत्सव बैलपोळ्यापुरता एका दिवसात संपत नाही. सलग दोन दिवस गावात उत्साहाचे वातावरण असते. शुक्रवारी (दि. ११) गौराई यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या सहभागातून गौराईची मिरवणूक काढण्यात आली.धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रंगत पाहायला मिळणार आहे.

यात्रेचे विशेष आकर्षण ठरणार आहे ते जंगी कुस्ती आखाड्याचे. नामवंत मल्लांच्या कुस्त्यांनी आखाडा रंगणार असून विजेत्या मल्लांना ग्रामस्थांच्या वतीने रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्यामुळे गौराई यात्रेलाही मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

बैलपोळा आणि गौराई यात्रा या दोन्ही उत्सवांमुळे गावातील सामाजिक एकोपा, परस्पर सहकार्य आणि सामूहिक सहभागाची भावना अधिक दृढ होत असल्याचे चित्र आहे.

**घुंगरांचा नाद थांबला; पण नाते कायम!**

सायंकाळी मिरवणूक संपली, ढोल-ताशांचा गजर शांत झाला, फटाक्यांची आतषबाजी थांबली आणि बैलांच्या गळ्यातील घुंगरांचाही नाद विरला.

कान्हूर-पठारचा बैलपोळा एकच गोष्ट ठामपणे सांगून जातो....

बैलपोळा ही केवळ परंपरा नाही; ती आपल्या मातीशी, शेतीशी आणि सर्जा-राजाशी जोडलेली भावना आहे... परंपरा जपायची नसते, ती मनापासून जगायची असते.!

या मिरवणूक सोहळा प्रसंगी कान्हूर-पठारच्या सरपंच संध्या ठुबे,उपसरपंच प्रसाद नवले, गोकुळ काकडे,किरण ठुबे, सागर व्यवहारे, वैशाली ठुबे, श्रीकांत ठुबे,वैभव साळवे, धनंजय ठुबे,राजाराम ठुबे, कांतिलाल साळवे, बापू चात्तर, धनंजय व्यवहारे, विशाल लोंढे, सूरज नवले, सुनीता ठुबे, गणेश तांबे, बाबासाहेब गुमटकर, नामदेव ठुबे, अब्बास मुजावर, अंजली भालेकर आदी उपस्थित होते.

पारनेर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर पोलिसांनी मिरवणुकी दरम्यान चोख बंदोबस्त ठेवला. कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही कार्यक्रम शांततेत पार पडला.




**नगरमधील दिल्लीगेट येथील सातभाई गल्ली मित्र मंडळाने वृंदावनाच्या भगवान श्रीकृष्णचे प्रेम मंदिराचा सुमारे ७० फुटी देखावा बनविला आहे,भव्य असे हे मंदिर दिल्लीगेट वेशीजवळून जाताना नजरेत भरते (होतो-महेश कांबळे)**

# श्री दत्त कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूटची गुणवत्ता यादीत गगनभरारी!

## कु. संस्कृती हंगेकर हिने ९८.५० टक्के गुण मिळवत संस्थेसह जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला!

**निघोज (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या जीसीसी-टीबीसी शासकीय कॉम्प्युटर टायपिंग बेसिक कोर्स परीक्षेचा जुलै २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत श्री दत्त कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट, राजूरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत संस्थेच्या गुणवत्तेची गगनभरारी घेतली आहे. कु. हंगेकर संस्कृती उद्धव हिने मराठी ३० शब्द प्रतिमिनिट या विषयात तब्बल ९८.५० टक्के गुण मिळवत संस्थेसह जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे संस्थेच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी तब्बल ७८ टक्के विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणीसह विशेष प्राविण्य मिळविले आहे.

मराठी ३० शब्द प्रतिमिनिटमध्ये हंगेकर संस्कृती उद्धव ९८.५० टक्के, हेकरे साई संजय ९६.५० टक्के, आसवले समीर बन्सी ९३.५० टक्के, पंडित आर्यन गणेश ९०.५० टक्के आणि चिखले संजना भाऊसाहेब ९० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. इंग्रजी ३० शब्द प्रतिमिनिटमध्ये आसवले समीर बन्सी ९५ टक्के, माने साई दीपक ९२ टक्के, कडू वैष्णवी राजू ९१ टक्के आणि धादवड यशवंत दामोधर ९०.५० टक्के गुण मिळवून यशस्वी झाले. इंग्रजी ४० शब्द प्रतिमिनिटमध्ये पिचड तनुजा सिताराम व साबळे सुयोग यशवंत यांनी प्रत्येकी ८९.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला, तर हंगेकर संस्कृती उद्धव हिने ८५ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. हिंदी ३० शब्द प्रतिमिनिटमध्ये म्हशाळ गणपत अनाजी यांनी ६४.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला.

ग्रामीण, आदिवासी तसेच अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. या यशाबद्दल प्राचार्य पंकज आभाळे सर, संस्थाचालक श्री. आभाळे सर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. परिसरात संस्थेसह विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांचा नियमितपणा, सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि पालकांनी संस्थेवर ठेवलेला विश्वास यामुळे हे यश मिळाले असल्याची भावना संस्थाचालक श्री. आभाळे सर यांनी व्यक्त केली.

# आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठाणच्या वतीने कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण उत्साहात संपन्न

**देवळाली प्रवरा(समर्थ गांवकरी)**




आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठाण, लक्ष्मणबाग, देवळाली प्रवरा यांच्या वतीने कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम आज, रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामविकास प्रशिक्षण केंद्र, लक्ष्मणबाग येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, उत्पादन खर्च कमी करून उत्पादन व गुणवत्ता वाढविता यावी, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षणामध्ये श्री. शिवाजीराव जगताप (माजी कृषी सहसंचालक) आणि प्रा. श्री. चिमाजीराव बाचकर (च.ड्ल. कृषी रोगशास्त्रज्ञ, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) यांनी दोन सत्रांमध्ये शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कांदा उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, लागवड पद्धती, रोग व कीड व्यवस्थापन, उत्पादन वाढीसाठी आवश्यक बाबी आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान झझढ द्वारे प्रकल्पाची माहिती तसेच विविध प्रात्यक्षिकात्मक व्हिडिओ दाखवून विषयाचे सुलभ स्पष्टीकरण करण्यात आले. शेतकऱ्यांनी विविध प्रश्न व शंका उपस्थित केल्या असता दोन्ही तज्ज्ञ मार्गदर्शकांनी त्यांचे समाधानकारक निरसन केले.

या प्रशिक्षणासाठी १२ गावांमधून तसेच अहिल्यानगरसह एकूण ३ जिल्ह्यांमधून ४२ शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्रशिक्षणादरम्यान झालेली प्रश्नोत्तरे यामुळे कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व परिणामकारक ठरला.

प्रशिक्षणाच्या निमित्ताने SP -सी यांच्या आधुनिक कांदा लागवड यंत्राची प्रत्यक्ष माहिती व प्रात्यक्षिकाची संधी शेतकऱ्यांना मिळाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कांदा उत्पादनात सुधारणा करण्यासाठी हे प्रशिक्षण निश्चितच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला. कांदा उत्पादन वाढवूया, शेतकरी समृद्ध बनवूया! या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल सहभागी शेतकऱ्यांनी आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठाणचे कौतुक व आभार व्यक्त केले.

आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठाण

लक्ष्मणबाग, देवळाली प्रवरा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर.

# लोकन्यायालयात मोटार अपघात प्रकरणात ४४ लाखांची नुकसानभरपाई

## तडजोडीने प्रकरण निकाली मयत मानसी शर्मा यांच्या वारसांना धनादेश प्रदान

**पारनेर (समर्थ गांवकरी)**




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर व जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकन्यायालयात मोटार अपघात नुकसानभरपाईच्या एका प्रकरणात मयत मानसी हेमंत शर्मा यांच्या वारसांना तब्बल ४४ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. अर्जदारांच्या वतीने ड. श्री. राहुल झावरे व ड. श्रीमती स्नेहा राहुल झावरे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. विमा कंपनी व अर्जदार यांच्यात आपसात तडजोड होऊन ४४ लाख रुपयांची नुकसानभरपाई निश्चित करण्यात आली. त्याबाबतचे तडजोडपत्र राष्ट्रीय लोकन्यायालयात नोंदविण्यात आले.

लोकन्यायालयाच्या आदेशानुसार आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीकडून मयत मानसी शर्मा यांच्या वारस मायादेवी शर्मा यांना नुकसानभरपाईच्या रकमेचा धनादेश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब श्री. शिवाजी कचरे, अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधीश-१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब श्री. आर. एस. गुप्ता, यांच्या हस्ते संबधित वारसांना प्रदान करण्यात आला. यावेळी श्री. के. एस. कुलकर्णी, जिल्हा न्यायाधीश-६, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, वाय. एस. पैठणकर, पॅनल विधीज्ञ ड. श्री. फारुक शेख, अर्जदारांचे वकील ड. श्री.राहुल झावरे व ड. श्रीमती स्नेहा राहुल झावरे, विमा कंपनीच्या वतीने ड. श्रीमती सुजाता गुंदेचा, ड. श्री. शहादेव जगताप, सुधा भगत तसेच आयसीआयसीआय लोम्बार्ड इन्शुरन्स कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा न्यायाधीश-१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब श्री. आर. एस. गुप्ता, यांनी सांगितले की, आपसातील तडजोडीच्या माध्यमातून प्रकरणे निकाली काढल्यास अर्जदार तसेच विमा कंपनी या दोन्ही पक्षांना त्याचा लाभ होतो. वाद तडजोडीने मिटल्यामुळे न्यायव्यवस्थेवरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी होण्यास मदत होते.

# ऑनलाईन ॲपवर मैत्री; निर्जनस्थळी बोलावून लुटमार करणारी टोळी गजाआड

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

मोबाईलवरील ग्रिंडर ॲपव्दारे अनोळखी व्यक्तीशी मैत्री प्रस्थापित करून तिला भेटण्यासाठी निर्जनस्थळी बोलावून मारहाण करीत लुटमार करणार्या तिघांच्या टोळीला कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी संशयित आरोपींकडून दुचाकी, दोन मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख २ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथील एका व्यक्तीने कोतवाली पोलीस ठाण्यात ५ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीशी आरोपींनी मोबाईलवरील ग्रिंडर ॲपच्या माध्यमातून मैत्री केली.

त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी लिंक रोड, केडगाव येथे भेटण्यासाठी फिर्यादीस बोलावण्यात आले. त्यानुसार फिर्यादी तेथे गेले असता आरोपींनी संगनमत करून त्यांना मारहाण केली. एकूण १२ हजार ५०० रूपयांची रक्कम बळजबरीने काढून घेतली.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

तपासादरम्यान हा गुन्हा यश मनोज भिंगारदिवे (वय २१, रा. संजयनगर, श्रीरामपूर), सिध्दांत दत्तात्रय जगताप (वय २२) आणि सुमित संजय गायकवाड (वय २२, दोघे रा. इंगळे वस्ती, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) या तिघांनी केल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून तिन्ही आरोपींना शिताफीने अटक केली.

